मंगळवार, २० डिसेंबर २०२२
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१२४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 20 DECEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-124 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5





कर्नाटक सरकार हाय हाय.. बोम्मई सरकार हाय हाय... शिंदे सरकार हाय हाय... गद्दारांचे पाप महाराष्ट्राला ताप... खोके सरकार, खोटे सरकार... ५० खोके एकदम ओके... खोके सरकार काय म्हणतंय, गुजरातला प्रकल्प न्या म्हणतंय... शेतकऱ्याला मदत नाय म्हणतंय... महाराष्ट्राची पिळवणूक, गुजरातमध्ये गुंतवणूक... अशाप्रकारे शिंदे सरकारचा निषेध करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी करत विधानभवन परिसर दणाणून सोडला.

# कानडी पोलिसांची मुजोरी

## महाराष्ट्राच्या पुढाऱ्यांवर लाठीचार्ज

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर : बेळगाव येथे महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केलेल्या मराठी भाषिकांच्या महामेळाव्यासाठी निघालेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांवर कर्नाटक पोलिसांनी लाठीमार केला आहे. महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवरील कोल्हापूर जिल्ह्यातल्या कागल आणि निपाणी सीमा हद्दीतील दूधगंगा पुलावर ही घटना घडली. यामुळे महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवर सुमारे दीड तास तणाव पाहायला मिळाला.**

निपाणी, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, या घोषणांनी आज महाराष्ट्रातील कागल परिसर दणाणून गेला. बेळगाव येथे मराठी भाषिकांवर वारंवार होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आणि महाराष्ट्र एकीकरण समितीने बेळगाव येथे आयोजित केलेल्या मराठी भाषिकांच्या महामेळाव्याला जाण्यासाठी आज महाविकास आघाडीचे नेते कागल येथे एकत्र आले. यामध्ये राष्ट्रवादीचे नेते आणि माजी ग्रामविकासमंत्री आमदार हसन मुश्रीफ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे जिल्हाध्यक्ष विजय देवणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कागलच्या मध्यवर्ती बस स्थानकातून ते कर्नाटकच्या दिशेने अर्थात निपाणीकडे चालत जाण्यासाठी निघाले. यावेळी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्याविरोधात जोरदार घोषणा बाजी केली. मात्र महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवर असणाऱ्या दूधगंगा पुलावर कर्नाटक पोलिसांनी रस्ता अडवला होता. अखेर कागलवरून बेळगावच्या दिशेने निघालेला हा मोर्चा कर्नाटक पोलिसांनी बळाचा वापर करून रोखला. यावेळी कर्नाटक पोलिसांनी माझ्यावरही लाठीमार केल्याचा आरोप आमदार हसन मुश्रीफ यांनी केला आहे. दरम्यान, या गोंधळानंतर ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख विजय देवणे हेही आक्रमक झाले होते. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महामेळाव्याला सशर्त दिलेली परवानगी पुन्हा एकदा कर्नाटक सरकारने नाकारल्यानंतर त्यांनी कर्नाटक सरकारचा जाहीर निषेध केला आहे. कर्नाटक पोलीस आणि आंदोलकांत झालेल्या धक्काबुक्कीनंतर म्हाविकास आघाडीच्या नेत्यांची भाषणे झाली. त्यानंतर महाविकास आघाडीचे नेते हे महाराष्ट्र पोलिसांच्या गाडीत जाऊन बसले. मात्र महाराष्ट्र पोलिसांनी आम्हाला ताब्यात घेऊन सोडल्याचे आमदार हसन मुश्रीफ यांनी म्हटले आहे.

# मी ट्विटर प्रमुखपदाचा राजीनामा देऊ का?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** टेस्ला आणि ट्विटरचे प्रमुख एलॉन मस्क यांनी आपल्या नव्या ट्वीटमध्ये 'मी ट्विटरच्या प्रमुखपदाचा राजीनामा देऊ का?' असा प्रश्न विचारत पोल घेतला. तसेच ट्विटर वापरकर्ते जो कौल देतील त्याप्रमाणे मी निर्णय घेईन, असे म्हटले. आता या ट्विटर पोलचा निकाल आला आहे.



या पोलमध्ये १ कोटी ७५ लाख युजर्सने मतदान केले आहे. यात बहुमत एलॉन मस्क यांनी राजीनामा द्यावा, यावर आले आहे. हे ट्वीट मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून अनेक लोक त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. एलॉन मस्क यांच्या ट्वीट पोलमध्ये ५७.५ टक्के लोकांनी मस्क यांनी ट्विटरच्या प्रमुखपदाचा राजीनामा द्यावा, यावर मतदान केले. दुसरीकडे ४२.५ युजर्सने मस्क यांनी राजीनामा देऊ नये, याला मतदान केले. यासह बहुमत एलॉन मस्क यांनी राजीनामा द्यावा यावर आले आहे. त्यामुळे मस्क काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एलॉन मस्क म्हणाले होते, मी ट्विटरच्या प्रमुखपदावरून पायउतार व्हावे का? मी या ट्विटर पोलच्या निकालाला बांधील असेन. या ट्वीटवर मस्क यांचे चाहते त्यांनी ट्विटरच्या प्रमुखपदावरून पायउतार होऊ नये असं सांगत आहेत. दुसरीकडे मस्क यांच्या निर्णयांवर नाखूश वापरकर्ते या ट्विटर पोलला काहीही अर्थ नाही. कागदोपत्री कामांसाठी वेगळी व्यक्ती नेमली जाईल आणि मुख्य निर्णय मस्क यांच्या म्हणण्याप्रमाणेच होतील, अशी टीका करत आहेत. दरम्यान, एलॉन मस्क यांनी ट्विटरची कमान हातात घेतल्यापासून मायक्रो ब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर अनेक प्रकारचे बदल करण्यात आले आहेत. एकीकडे कंपनीत कर्मचाऱ्यांच्या नोकर कपातीचा प्रश्न ऐरणीवर आहे, तर दुसरीकडे मस्क एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घेत आहेत. त्यांनी एक मोठा निर्णय घेत मायक्रो ब्लॉगिंग साईट ट्विटरवरील १५० कोटी अकाउंट बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या फोटोला काँग्रेसचा विरोध



आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू :** कर्नाटकमध्ये सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांचा फोटो राज्याच्या विधानभवनामध्ये लावल्याने नवीन वादाला तोंड फुटले आहे. विरोधकांनी हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी या मुद्द्यावरुन वाद घातला आहे. बेळगावमध्ये आजपासून कर्नाटक सरकारचे हिवाळी अधिवेशन सुरु झालं असून सावरकरांच्या फोटोला काँग्रेसने विरोध केला आहे. काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामध्ये या फोटोची गरज काय आहे असा प्रश्न विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना विचारला. वादग्रस्त व्यक्तीमत्वाचा फोटो विधानभवनामध्ये का लावण्यात आला आहे, असे सिद्धरामय्या यांनी विचारले. त्यांना विधानसभेच्या कामकाजामध्ये अडथळा निर्माण करायचा आहे. त्यांना आंदोलन दडपून टाकायचे आहे. या अधिवेशनात आम्ही भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करणार याचा त्यांना अंदाज होता. त्यामुळेच विरोधकांबरोबर चर्चा न करता त्यांनी सावरकरांचा फोटो लावला, असे काँग्रेसचे नेते डी. के. शिवकुमार यांनी म्हटले आहे. कर्नाटकमध्ये २०२३ साली येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीआधी सावरकरांसंदर्भात सुरु असलेल्या वादांच्या यादीमध्ये या वादामुळे नव्याने भर पडली आहे. राज्यभरामध्ये सावरकरांच्या कार्याचा प्रसार करण्याच्या उद्देशाने भाजपाने मोहीम हाती घेतली आहे. त्याचअंतर्गत बेळगावमध्येही जागृती केली आणि म्हणूनच हा फोटो लावण्यात आल्याचे भाजपा नेत्यांनी सांगितल्याचा उल्लेख एका न्यूज चॅनलच्या वृत्तात आहे.

# ध्येयवादी लोक नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतात : अण्णा हजारे

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे केले तोंडभरून कौतुक



आधुनिक केसरी न्यूज

अहमदनगर : सत्तेची हवा डोक्यात गेल्यावर अनेक लोक बदलतात, मात्र काही ध्येयवादी लोक नागरिकांच्या हिताचे निर्णय घेत असतात, असे म्हणत लोकायुक्त कायद्याचे विधेयक आणत असल्याबद्दल आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून अभिनंदन केल्याचे अण्णा हजारे यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

तब्बल बारा वर्षांच्या पाठपुराव्यानंतर राज्यात लोकायुक्त कायद्याचे विधेयक विधिमंडळात येत असल्याने यासाठी पाठपुरावा करीत असलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी समाधान व्यक्त केले आहे. याबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतूक केले.


लोकपालच्या धर्तीवर राज्यात लोकायुक्त नियुक्त करण्याची मागणी होती. यासाठी गेल्या बारा वर्षांपासून हजारे यांनी विविध आंदोलने केली. अखेर यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या त्यांचाच समावेश असलेल्या समितीचा अहवाल राज्य सरकारने स्वीकारला. या मसुद्याला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात येऊन हे विधेयक नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ठेवण्यात येणार आहे.


अण्णा हजारे पुढे म्हणाले की, राज्य सरकारचा हा निर्णय राज्यासाठी समाधानकारक आहे. लोकायुक्त हा स्वायत्ता असलेला कायदा आहे. लोकायुक्ताला उच्च न्यायालयाचा दर्जा आहे. हा कायदा इतरांपेक्षा वेगळा आहे. लोकायुक्त एकदा नेमला की तो नियमानुसार कारवाई करू शकतो. असा हा क्रांतिकारक कायदा आहे. खरे तर हा कायदा २०११ ला लोकपालसोबतच राज्यात यायला हवा होता. केंद्रात लोकपाल आणि राज्यात लोकायुक्त अशी संकल्पना आहे. संसदेत लोकपाल कायदा मंजूर झाला आहे. यासाठी आम्हाला मोठा संघर्ष करावा लागला. पक्षविरहित आंदोलन यासाठी उभे केले. बारा वर्षे पाठपुरावा केला. मात्र. आमच्या या तपाला यश आले, याचे समाधान आहे, असेही हजारे म्हणाले.

ढील योजना सांगताना हजारे म्हणाले, आता यापुढे आम्ही या कायद्यासाठी प्रबोधन करणार आहोत. वयाची ८५ उलटली तरी लोकशिक्षणासाठी वेळ पडली तर मी राज्यात दोरा करणार आहे. लोकांना जागृत करून या कायद्याचे महत्व पटवून देणार आहोत. हे काम झाले तर भ्रष्टाचाराला आळा बसेल. मुख्यमंत्री असो की मंत्री, आमदार त्यांची आता चुकीचे वागण्याची हिंमत होणार नाही. आजपर्यंत जे झाले, ते होणार नाही असा हा कायदा आहे. याबद्दल आपण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांनी याचे श्रेय जनतेला दिले आहे. शिवाय भ्रष्टचार मुक्त महाराष्ट्र करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.



# उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## चहा घ्यावा, चहा द्यावा ...!

काल असाच बऱ्याच दिवसांनी पाहुण्यासारखा आलेल्या पावसाला निरखीत बसलो. मग कायचहाची तलफ आली. पण पाहतो तो काय आमच्या सौ कुठेतरी बाहेर गेलेल्या. कधी कधी मी स्वतः हीचहाबनवतो, पण हिच्याचहासारखाचहाकाही मला जमत नाही. ( आणि हे कबुल करण्यात मला कमीपणा वाटत नाही. माणसाने प्रामाणिक असावे. आणि काही काही गोष्टी कबूल करून टाकाव्यात )


तर असा हाचहा. प्रत्येक वेळी त्याची लज्जत न्यारी. सकाळी वर्तमानपत्र वाचताना हातातचहाचा कप असला की बातम्याही चवदार होतात जणू काही...! मग मोदी काय म्हणाले, उद्धव काय म्हणाले, पवारांनी कोणती विधाने केली हे सगळे चहाच्या घोटाबरोबर वाचताना फार मजा येते. मी असं ऐकलय की रेल्वे स्टेशनवर पूर्वीचहादोनच वेळा मिळायचा. सकाळी आणि संध्याकाळी चार वाजता. पण कोणातरी हुशार, सुज्ञ व्यक्तीने दिवसातले चोवीस तासचहाविकण्याची कल्पना शोधून काढली. पण त्याची कल्पना लोकांनी खरी ठरवली आणि लोक कोणत्याही वेळीचहापिऊ लागले. मध्यरात्री अगदी बारा वाजता गाडी एखाद्या स्थानकावर थांबली असेल तर तेव्हाही काही महाभाग. ( ..! ) चहापिताना आपल्याला हमखास दिसतील. तात्पर्य, चहाला कोणतीही वेळ वर्ज्य नाही.

प्रसंग आनंदाचा असो वा दुःखाचा. चहाहा स्वागतार्ह असतो. अगदी मित्रांमधली पैज असो, नाहीतर रंगलेला गप्पांचा फड असो त्याचा शेवटचहानेच व्हायचा. चहाच्या जन्माचीही कथा मजेदार आहे. अगदीचहाच्या चवीसारखी. अशी आख्यायिका आहे की एकदा चीनचा एक सम्राट लढाईसाठी जंगलातून फिरत होता. त्यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने सावधानी बाळगावी म्हणून तो पाणी सुद्धा उकळून पीत असे. एकदा तो असेच थकून बसलेला असताना त्याने पिण्यासाठी गरम पाणी मागवले. तेव्हा नकळत पाण्यात झाडाची चारदोन पाने पडली. त्या पानांमुळे पाण्याचा रंग बदलला आणि त्याने कुतूहल म्हणून ते पाणी पिऊन पाहिले तर काय अप्रतिम चव, सुगंध आणि स्वाद यामुळे तो खुश झाला आणि त्याची झोप, त्याचा थकवा कुठल्या कुठे पळून गेला. आहे की नाही मजेशीर कथा ..!

तर असा हा मजेशीरचहा. याचहाचा शोध सतराव्या शतकात इंग्रजांना लागला असे म्हणतात. मग त्यांनी तो त्यांच्यासोबत भारतात आणला. ब्रिटीशांनी ज्या काही बऱ्यावाईट गोष्टींची देणगी भारताला दिली त्यातचहाया पेयाचा समावेश होतो. पण त्यांचा तो काळा, कमी उकळलेला, कमी दुध साखर घातलेलाचहाआपण बदलून टाकला. त्याला भारतीय रूप दिले. जास्त उकळलेला, जास्त दुध साखर असलेलाचहाआपण घ्यायला लागलो. चहाचे अनेक प्रकार आहेत. black tea, ग्रीन टी इ. पण लोकप्रियता आपल्या नेहमीच्याचचहाला लाभली बर का...!

पूर्वी ( आणि अजूनही काही वेळा ) वधू परीक्षा करताना ती मुलगीचहा, पोहे कसे देते, त्यावेळी ती कशी दिसते,चालते बोलते कशी याचे निरीक्षण केले जायचे. एकंदरीत कायचहाहा वधुपरीक्षेचा एक अविभाज्य भाग होता.

सौतन या चित्रपटात एक गाणे आहे. ' शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है, इसीलिये मम्मीने तुम्हे चाय पे बुलाया है.' उषा खन्ना यांचे संगीत असलेले हे बहारदार गाणे गायिले आहे किशोरकुमार आणि लता मंगेशकर यांनी. तेव्हा मंडळी, हे गाणे ऐका. आणिचहाचा आस्वाद घ्या. वाटलं तर मलाही ' चायपे ' बोलवा. **( माझ्या 'कवडसे सोनेरी.. अंतरीचे' या पुस्तकातून साभार )**



# आनंदी पहाट

## मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात खरी परीक्षा आपल्या धीराची, सचोटीची, मेहनतीची, हुशारीची, बौद्धिक कौशल्याची असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपण नवीन परीक्षाच देत असतो. अनेकदा ही परीक्षा देताना प्रत्येकाला परीक्षार्थी होणे पसंत नसते; परीक्षकाची भूमिका वठवली जावी असे वाटत असते. समुपदेशकाने सर्वप्रथम श्रोत्याची आणि मग संवादकाची भूमिका बजावली पाहिजे. अनेकदा संवादामध्ये बोलणाऱ्या व्यक्तीचे नीट ऐकून आणि समजूनच घेतले जात नाही. परस्परांमध्ये सकारात्मक संवाद घडत राहणे सतत गरजेचे असते. घरातील नकारात्मक वातावरणाचा परिणाम प्रत्येकाच्या मानसिकतेवर, शरीरावर, मनावर, परस्पर संबंधांवर, शिक्षणावर म्हणजेच प्रत्येक गोष्टीवर होऊ शकतो. अशावेळी मानसिक पातळीवर समुपदेशन उपयुक्त ठरते. मानसशास्त्र हा भारतातील करिअरचा एक चांगला पर्याय आहे. भारतात हळूहळू प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांची मागणी वाढत आहे. मानसशास्त्राच्या विविध शाखा प्रसिद्ध आहेत क्लिनिकल, समुपदेशन, औद्योगिक, शैक्षणिक (शालेय) आणि न्यायवैद्यक मानसशास्त्र. क्लिनिकल सायकॉलॉजी हे भारतातील मानसशास्त्राच्या प्रस्थापित क्षेत्रांपैकी एक आहे. अलीकडच्या काळात अनेकांना आपल्या मनातील विचार सांगून मोकळे होता येत नाही, अनेकांना मानसिक पातळीवर खूप मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. मोकळेपणाने मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचे देखील जाणवते. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचे निराकरण होत जाते. काहीवेळा उद्‌भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीने मोकळेपणाने आपल्या मनांतील शंका व्यक्त करणे उपयुक्त ठरते. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**थकली रे काया | संसारात ||**

काय करू देवा | आणीक सायास
मिटली रे आस | देहाची ह्या ||१||
मना लागे ओढ | तुझ्या चरणाची ||
मज पामराची | काकुळती ||२||
क्षुधा-तृष्णा सारी | हरपून गेली ||
भ्रांत ना उरली | तुजवीन ||३||
चिंतनी चिंतन | क्षणोक्षणी चाले ||
संदेह निमाले | अंतरीचे ||४||
धाव धाव आता | धाव विठुराया ||
थकली रे काया | संसारात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरुपण”

आधुनिक केसरी

## भक्ती

सिंहकमलहंसानाम्स शोभिताऽसनानि च ।
ते पावनानि रूपाणि
स्थास्यन्तु हृदि मे सदा ।।७।।
सिंह, कमल आणि हंसाची आसनं तू सुशोभित करतेस. अशी तुझी पावन रूपं माझ्या हृदयात स्थिर असावीत.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

अनेकदा असा अनुभव येतो की एका सारखीच दुसरी पण वस्तु आपल्याला तंतोतंत दिसते . म्हणजेच जगात अनेक वस्तु आहेत आणि त्या शोधून काढणे हा माणसाच्या ज्ञानाचा प्रधान हेतु असतो. ऊदा फळेफुले एकसारखी दिसणारी माणसे, विविध प्रकारच्या देवादिकांच्या मुर्ती की ज्या अनेक शतकं ओलांडून सुध्दा जशाच्या तशा राहिल्या आहेत.माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या आयुष्यात अशा अनेक आश्चर्यकारक गोष्टींचा आदर वाढतो व त्याचा इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा मनामध्ये निर्माण होते. प्रत्येक वस्तुवेगळेपणाने जगते. तिला स्वतः चा आकार असतो,रंगरूप असते ती कालाबरोबर बदलते. कालांतराने नाश पावते. याच्या उलट अनेक वस्तूंमधील एकपणा सर्व वस्तूंना व्यापून रहातो. त्या एकपणाला आकार नसतो ,रंगरूप नसते. तो काळाबरोबर बदलत नाही. कधीही नाश पावत नाही. वस्तू मुर्त असते. तर वस्तूंना व्यापणारा एकपणा अमूर्त असतो. अनेक वस्तूंना व्यापून रहाणार्या एकपणाचे क्षेत्र विशाल करताकरता अखेर सर्व वस्तूंना एकपणाने पोटात घेणाऱ्या ब्रम्हापर्यन्त आपण पोहचतो. मानवी बुध्दीच्या भूमिकेवरून या परब्रम्हाचे वर्णन करण्यास संपूर्ण विश्वातील वस्तु शोधाव्या लागतात. तेव्हा अशा प्रकारचा विचार जेव्हा केला जातो तेव्हा चोदा प्रकारांनी ब्रम्हाचें वर्णन योग्यचं आहे .परंतु आत्मसाक्षात्कारी पुरूष मानवी बुध्दीच्या मर्यादा ओलांडून जातात. त्यांच्या द्रुष्टीने ही चौदा लक्षणे पूर्णब्रम्हाचे वर्णन करण्यासाठी कमी पडतात.ह्या सर्वाचे यथोचित ऊत्तर यासमासात आपल्याला समर्थ देतात म्हणून हा समास तर्क,शुध्दज्ञान,अफाट बुध्दीमत्तेचे दर्शन घडवते. ते कसे हे आपण 1ते 53 व्या ओवीपर्यन्त शब्दरूपात मांडण्याचा अल्पसा प्रयत्न करणार आहे. समर्थाचे आशिर्वाद व
वाचकांच्या प्रमामुळे हे शक्य होणार आहे काही चुकले तर समर्थ क्षमा करतील याची खात्री आहे.
जय जय रघुवीर समर्थ




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# वेदान्त हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे

आधुनिक केसरी

भगवंताची उपासना करणारे जे ऋषी असतात त्यांचे मन अशा एका अवस्थेमध्ये राहते की, त्या ठिकाणी परमात्माच सर्व काही करतो ही भावना स्पष्टपणे प्रकट होते. भगवंताशी एकरूप होऊन जाण्याचीच ती अवस्था आहे. ऋषींचा मीपणा नष्ट झालेला असल्याने, 'मी करतो, मी बोलतो, मी काव्य करतो,' ही भावनाच त्यांना नसून, 'परमात्मा करतो, परमात्मा बोलतो, परमात्मा मंत्र रचतो' असा स्पष्ट आणि खरा अनुभव त्यांना येतो. या थोर अवस्थेमध्ये ऋषींच्या तोंडून वेदमंत्र बाहेर पडलेले असल्यामुळे ते मानवाची कृती नव्हेत. वेद हे खरे अपौरुषेयच आहेत. घराच्या छपराखाली ज्याप्रमाणे सर्व लहान लहान खोल्या येतात, त्याप्रमाणे वेदांतात इतर शास्त्रे येतात. वेदांताच्या गोष्टी किंवा ज्ञान हे पक्वान्नांच्या ज्ञानाप्रमाणे आहे. जो मनुष्य वेदांताचा नुसताच अभ्यास करतो त्याला त्यापासून फारसा फायदा होत नाही. वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे. खरे म्हणजे विद्वान लोक हा वेदांत अत्यंत कठीण करून जगाला उगीच फसवितात. मग सामान्य माणसाला वाटते की, 'अरे, हा वेदांत आपल्यासाठी नाही !' वास्तविक, वेदांत हा सर्वांसाठी आहे. मनुष्यमात्रासाठी आहे. वेदांताशिवाय



मनुष्याला जगताच येत नाही. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते निःस्वार्थी बनणे, हेच खऱ्या वेदांताचे मर्म आहे.

भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातील वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असतां ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या सहाय्याने जड बनणे हे व्यवहाराचे स्वरूप आहे. याच्या उलट, भगवंत अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे आहे. तेव्हां भगवंताचे साधन हेही जडापासून सूक्ष्माकडे पोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते एक नामच होय. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला. पुष्कळ वेळा, चांगले अधिकारी जीव एखाद्या लहानशा वासनेमुळे अडकून पडतात. मग ते अध्यात्मदृष्ट्या चांगल्या कुळामध्ये जन्म घेतात. तिथे त्यांची वासना तृप्त व्हायला वेळ लागत नाही; म्हणून ते लहानपणीच जग सोडून जातात. त्यांच्या मृत्यूचे दुःख करणे बरोबर नाही. वासना ही दुसऱ्या कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. वासना नष्ट झाली की बुद्धी भगवत्स्वरूपच होईल. जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

**आजचे बोधवचन – प्रत्येक वेदमंत्राच्या आरंभी 'हरिः ॐ' असते , ते नामच आहे.**

# लोकसभा निवडणुकीच्या आगामी महासंग्रामासाठी भाजपाची संघटना बळकट करा, लक्ष्य ५१ टक्के मते

## राष्ट्रीय सरचिटणीस सी. टी. रवी आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभेच्या २०२४ साली होणाऱ्या निवडणुकीत होणाऱ्या महासंग्रामासाठी 'अभी नही तो कभी नही' या जिद्दीने कामाला लागावे. सरकारची कामे जनतेपर्यंत पोहोचवावीत आणि निवडणुकीत ५१ टक्के मते मिळविण्यासाठी संघटना बळकट करावी, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस व प्रदेश प्रभारी मा. सी. टी. रवी तसेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना केले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष व जिल्हा संघटन सरचिटणीसांची एक दिवसीय बैठक नागपूर येथे सोमवारी झाली. या बैठकीच्या उद्घाटनसत्रात मा. नेते बोलत होते. यावेळी भाजपा राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाशजी, प्रदेश सहप्रभारी जयभानसिंह पवैय्या आणि ओमप्रकाश धुर्वे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, विक्रांत पाटील, मुरलीधर मोहोळ, संजय केणेकर, रणधीर सावरकर आणि विजय चौधरी उपस्थित होते. सी. टी. रवी म्हणाले की, महाविकास आघाडीला लोक महावसुली आघाडी म्हणत असत.




पण आता राज्यात विकासाचे डबल इंजिन असलेले सरकार आले आहे. विकासाचे राजकारण सुरू झाले आहे. पण भाजपाने आत्मसंतुष्ट होण्याचे कारण नाही. आपला संघर्ष अजूनही चालू आहे. सरकारच्या योजना समाजातील शेवटच्या माणसापर्यंत कशा पोहोचतील यासाठी कार्यकर्त्यांनी काम करायचे आहे. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती जनतेला वारंवार सांगत राहिले पाहिजे. यासाठी संघटनात्मक जाळे बळकट करायचे आहे.

ते म्हणाले की, आगामी २०२४ च्या निवडणुकीत महासंग्राम आहे. त्यासाठी पक्षाने संघटना सर्वस्पर्शी आणि सर्वव्यापी होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात योजना निश्चित करून काम करण्याची गरज आहे.

भाजपाचे हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि विकास हे धोरण आहे. हिंदुत्व हा केवळ भाजपाचा नाही तर देशाचा आत्मा आहे. देशावर जेव्हा जेव्हा संकट आले त्यावेळी महाराष्ट्राने योगदान दिले आहे, असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यातील विविध जिल्ह्यांचा प्रवास करताना आपल्याला आढळले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यानंतर जनतेमध्ये पक्षासाठीचा पाठिंबा वाढला असून कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण झाली आहे. पण आगामी निवडणुकीत आपली ५१ टक्क्यांची लढाई आहे. आपल्याला पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवायची आहेत व त्यासाठी भाजपाची संघटना मजबूत करायची आहे. आगामी निवडणुकीत जेथे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उमेदवार असतील तेथेही भाजपाच्या संघटनेचा पाठिंबा त्यांना उपयोगी पडेल. त्यामुळे पक्ष संघटना बळकट करण्यासाठी आक्रमक रितीने कृतीशील भूमिकेत जावे लागेल. अभी नही तो कभी नही या जिद्दीने काम करावे लागेल.

मुरलीधर मोहोळ यांनी सूत्रसंचालन केले.

उद्घाटनसत्रा नंतर झालेल्या सत्रांमध्ये मा. श्रीकांत भारतीय यांनी जी ट्वेंटीच्या भारताच्या अध्यक्षपदाचे महत्त्व, मा. विजय चौधरी यांनी एक भारत, श्रेष्ठ भारत, मा. संजय केनेकर यांनी नव मतदार नोंदणी, मा. रणधीर सावरकर यांनी बूथ स्तरावर मन की बातचे कार्यक्रम आणि मा. माधवी नाईक यांनी फ्रेंड्स ऑफ बीजेपी याविषयी मार्गदर्शन केले. प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे यांनी शोकप्रस्ताव मांडला.

# वैजापुरात राष्ट्रवादीला गळती; पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकऱ्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यापूर्वी काही दिवस अगोदर माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर यांनी सुद्धा राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत ठाकरे सेनेत प्रवेश केला होता. आता राष्ट्रवादीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या पक्षातून बाहेर पडण्यामूळे सध्यातरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला वैजापूर तालुक्यात गळती लागल्याचे दिसत आहे. शनिवारी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्तिथीत वैजापूर तालुका व शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अतिशय सक्रिय नेते व शहराध्यक्ष प्रेम राजपूत, प्रहार जनशक्ती पक्ष शहराध्यक्ष नितीन तांबे, वैजापूर तालुक्यातील रेशन दुकानदार संघटनेचे सचिव जितू पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक आघाडीचे सर्कल अध्यक्ष उमेश वाघ, युवा नेतृत्व वैभव पवार आदींनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला असून याप्रसंगी भाजपा जिल्हा सरचिटणीस डॉ दिनेश परदेशी, तालुका अध्यक्ष कल्याण दांगोडे,गटनेते दशरथ बनकर, शहराध्यक्ष तथा नगरसेवक दिनेश राजपूत, नगरसेवक शैलेश चव्हाण, गणेश खैरे, गोकुळ भुजबळ, राजीव डोंगरे, मोहन आहेर, डिके पाटील, अनिल वाणी,संतोष मिसाळ, डॉ. डांगे, ज्ञानेश्वर इंगळे, सचिन दाढे, निलेश पारख, शैलेश पोंदे, सोमु सोमवंशी,



सचिन भाऊ राऊत, सोनू राजपूत, डॉ.हर्शल तोडरवाल, संदीप पवार, महेश भालेराव, किरण व्यवहारे, सणमीत खनिजो, हमीद जिलानी, नदीम शेख, दिपक पवार, ऍड सूरज राजपूत, पवन विश्वासू, गोलू पंजाबी, जाकिर कुरेशी, योगेश फुलारे, रोनक पंजाबी, हर्षद राजपूत, मसूद शेख सह सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अधिवेशन एक आठवड्यात गुंडाळणार, विशेष सूत्रांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**जगदीश कस्तुरे**

**औरंगाबाद :** नागपुरात आजपासून सुरु झालेले विधी मंडळाचे अधिवेशन एक आठवड्यातच गुंडाळले जाणार, असा दावा विशेष सूत्रांनी केला आहे. अधिवेशनाच्या पूर्व संध्येला काही आमदार आधुनिक केसरीशी वार्तालाप करत होते. विधीमंडळाचे अधिवेशन बिझनेस ऍडव्हायझरीकडून जरी दोन आठवडे चालणार आहे, असे सांगण्यात येत असले तरी कार्यक्रम पत्रिका ही एक आठवड्याचीच आहे. आर्थिक विषय या आठवड्यात संपवतील, तसेच येत्या शुक्रवारी राज्यसरकारतर्फे हे अधिवेशन गुंडाळण्यात येणार आहे, अशी दाट शक्यता काही आमदारांनी व्यक्त केली. हे आमदार म्हणाले की, सध्याचे राजकीय वातावरण हे अस्थिर आहे. विरोधी पक्षकाडून शॉर्ट नोटीसमध्ये चांगला मोर्चा काढला जाणे, राज्यपालांच्या विरोधात घोषणा देणे, लागोपाठ तीन चार वेळेस मंत्र्याची जीभ घसरणे, हे प्रकार सरकारच्या अंगलट आलेले आहेत. कर्नाटकाचा प्रश्न घेऊन सरकारला काही निर्णय घेण्यासाठी मजबूर करण्याची तयारी महाविकास आघाडीने केलेली आहे. हा सर्व घटनाक्रम पाहता अधिवेशन शुक्रवारी गुंडाळले जाणारच, अशी माहिती अधिवेशनासाठी हजर असलेल्या काही आमदारांनी दिली.

## क्रीडा स्पर्धेतील अपयशामुळे धावपटूची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शालेय क्रीडा स्पर्धेतील अपयशामुळे नैराश्येतून धावपटूने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नागपुरात घडली आहे. निखिल तराळे असे आत्महत्या केलेल्या मृत धावपटूचे नाव असून तो 16 वर्षांचा होता. त्याने शेतातील कडुलिंबाच्या झाडाच्या फांदीला दोरीने गळफास लावून आत्महत्या केली आहे. मानकापूर येथील क्रीडा संकुलनात जिल्हास्तरीय स्पर्धेत निखिलने चांगली कामगिरी केल्यानंतर त्यांची चंद्रपूर येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेकरता निवड झाली होती. मात्र चंद्रपूरातील विभागीय स्पर्धेत त्याला अपयश आल्याने त्याचे मनोधैर्य खचले होते. त्याच नैराश्येतूनच त्याने शेतात कडुलिंबाच्या झाडाच्या फांदीला दोरीने गळफास लावून आत्महत्या केली आहे. याप्रकरणी हिंगणा पोलीस पुढील तपास करत आहेत. नागपुरातील विभागीय क्रीडा स्पर्धेत 16 वर्षीय मुलाने शर्यतीत पराभूत झाल्यानंतर आत्महत्या केली. एका पोलीस अधिकाऱ्याने रविवारी यासंदर्भात माहिती दिली. हिंगणा पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यानं बोलताना सांगितले की, "16 डिसेंबर रोजी झालेल्या स्पर्धेत पराभव झाल्यानंतर निखिल घरी परतला.

# हरभऱ्याचे पीक मर रोगाच्या विळख्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील रब्बी हंगामात सर्वाधिक क्षेत्र हरभऱ्याच्या पिकाने व्यापले आहे. खरीप हंगामातील सोयाबीनच्या पिकाला अतिवृष्टीने घेरल्यामुळे त्याचा तडाका बळीराजाला बसला होता. त्यात रब्बी हंगामातील हरभऱ्याचे पिक चांगले येईल या आशेवर असताना हे पिक मर रोगाच्या विळख्यात सापडले आहे.

**उपाय काय करावे? :** या पार्श्वभूमीवर धर्माबाद तालुक्याचे कृषी अधिकारी सुरेंद्र पवार यांची प्रतिक्रिया घेतली असता ते म्हणाले की, शेतकऱ्यांनी सातत्याने सोयाबीन व हरभरा हे पिक घेण्याऐवजी पिक बदल करावे .पेरण्यापूर्वी बीजप्रकिऱ्या करावे, क्लरोफाईड फॉस्ट फवारणी करणे, हरभऱ्याला फुल येण्यापूर्वी एक वेळेस पाणी देणे या सारख्या उपायातून हा प्रादुर्भाव टाळता येतो . या सारख्या उपाययोजना करून शेतकऱ्यांनी आपले पिक सुरक्षित ठेवावे असे आव्हान कृषी अधिकाऱ्यांनी केले .

**काय आहे मर रोग? :** मर रोगाची बुरशी बियाण्यातून अथवा जमिनीतून मुळाद्वारे रोपात प्रवेश करते आणि खोडाच्या आतील भागात वाढते परिणामी जमिनीतील पाणी आणि अन्नद्रव्यांचा पानाकडे होणारा पुरवठा बंद होतो व त्यामुळे सुरवातीला या रोगात कोवळी पाने व फांद्या सुकतात आणि शेवटी पूर्ण झाड वाळून जाते . या रोगाचा प्रसार प्रामुख्याने जमीन आणि बियाद्वारे होतो . प्रथम पाने पिवळसर होतात आणि सुकतात . मर रोगग्रस्त झाड शेवटी पूर्णपणे मरून जाते . रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास झाडांची संख्या कमी होऊ पीक विरळ होते . परिणामी उत्पादनात घट होते .



**कशामुळे रोग प्रसार पावतो? :** शेतकऱ्यांने सतत द्वीदल पिक घेतल्यास हा जमिनीतून हा रोग पसरू शकतो .जसे सोयाबीनच्या पाठोपाठ हरभऱ्याचे पिक घेणे . तसेच ढगाळ वातावरण, जमिनीतील ओलावा या कारणामुळे ही या रोगाचा प्रदुर्भाव होतो .

## भाजपचा पलटवार

आधुनिक केसरी

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी भाजपा सरकार तैवांगमध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेला संघर्ष लपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे. तसेच चिनी सैनिक नियंत्रण रेषेपासून पुढे सरकत असून केंद्र सरकार मात्र वारंवार नकार देत असल्याचंही ते म्हणाले आहेत. दरम्यान राहुल गांधींच्या या आरोपांना केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी उत्तर दिले आहे. इंडिया टुडेच्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. एस जयशंकर यांनी राहुल गांधींचा उल्लेख टाळत म्हटले की लोक अनेक चर्चा करत असतात. ते कदाचित विश्वासार्ह नसतील. कधीतरी ते आपल्याच भूमिका आणि वागण्यामधील मतभेद दाखवतात. एस जयशंकर यांनी यावेळी चिनी सीमेवर भारतीय सैन्य मोठ्या प्रमाणात तैनात करण्याचं कारण सांगितलं. २०२० पासून सीमेवर चिनी सैन्याची उपस्थिती वाढली आहे. “जर आम्ही नकारच देत असतो,तर तिथे लष्कर कशाला तैनात केले असते? राहुल गांधींनी सांगितले आहे म्हणून तिथे सैन्य तैनात नाही आहे. पंतप्रधानांनी आदेश दिल्यानेच ते तिथे आहेत, असे एस जयशंकर म्हणाले. आम्ही चीनला प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (LAC) एकतर्फी बदलू देणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. अरुणाचल प्रदेश आणि लडाख सीमा भागात चीन युद्धाची तयारी करीत आहे, तर नरेंद्र मोदी यांचे सरकार निद्राधीन राहून संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष करीत आहे, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी केला. पत्रकारांशी संवाद साधताना राहुल गांधी म्हणाले, चीनचा वाढता धोका मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे. गेल्या दोन वर्षांपासून मी त्याकडे लक्ष वेधत आहे, पण सरकार मात्र दुर्लक्ष करून सत्य लपवण्याचा प्रयत्न करीत आहे. चीनच्या धोक्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही वा तो लपवलाही जाऊ शकत नाही. मोदी सरकार काहीही ऐकून घेण्यास तयार नाही. चीनची जोरदार तयारी सुरू आहे आणि ती युद्धासाठीच आहे, घुसखोरीसाठी नाही. त्यांच्या शस्त्रांचे स्वरूप आणि हालचाली पाहिल्या तर सर्व काही लक्षात येईल. पण मोदी सरकार हे लपवण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण सत्य स्वीकारणे त्याला जड जाते, अशी टीका राहुल यांनी केली. मोदी सरकार कार्यक्रमाधारित काम करते, धोरणात्मकृष्ट्या नाही, त्यामुळेच हे घडत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला. चीनने २००० किलोमीटर भारतीय भूभाग ताब्यात घेतला आहे. त्याचबरोबर २० जवानांचाही बळी घेतला आहे. शिवाय, हल्लीच अरुणाचल प्रदेशात आपल्या जवानांवर चिनी सैनिकांनी हल्ला केला, असेही राहुल गांधी म्हणाले होते.

## जागतिक मंदी आणि मजबूत भारतीय अर्थव्यवस्था



डॉ. राजू घनश्याम श्रीरामे
संपर्क क्र. : ७६२०८८१७२९

आधुनिक केसरी

**भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक मंदीच्या वादळातही मजबूतच असल्याचे द्योतक हे तिच्या प्रबलतेची साक्ष देतानाच दिसून येत आहे. आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेची ताकद ही तिची ग्राहक आधारित अंतर्गत शक्ती ही असून याच बळावर ती अत्यंत वेगाने पुढे यात असल्याचे अनेक अर्थतज्ञ मंडळीचे मत आहे. "बिघडत्या बाह्य घटकांच्या स्थितीतही भारताच्या वित्त वर्ष २०२२-२३ च्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात अर्थात जीडीपीमध्ये ऑक्टोबरच्या तुलनेत अधिक सुधारणा झालेली आहे.**

सध्याच्या घडीला संपूर्ण जगभर जागतिक मंदीची चर्चा असून या जागतिक मंदीच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांची धडपड चालू असलेली दिसून येत आहे. अशा परिस्थितीत जागतिक बँकेने आपले अनेक देशाविषयीच्या जीडीपीचे अंदाज विषयक अहवाल सार्वजनिक करणे सुरु केलेले आहेत. यात सर्व देशांच्या अर्थव्यवस्थांच्या संदर्भातील व्यक्त केलेला अंदाज हा इतर देशांच्या अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येत आहे. जागतिक बँकेने भारतीय अर्थव्यवस्थेच्या जीडीपी वृद्धीच्या अंदाजात वाढ केलेली असून केली या अहवालानुसार भारतीयअर्थव्यवस्था चांगल्या स्थितीत असल्याचे दिसून येत आहे. सध्याच्या काळात अनेक अशी चक्रीय उच्चावचनांची आवर्तने ही विकसित देशांच्या अर्थव्यवस्थेला ग्रासलेली असून अनेक देशांच्या अर्थव्यवस्थासमोर जागतिक मंदीच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी धडपड सुरु असलेली दिसून येतानाच भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात मात्र ही आशादायक स्थिती असल्याचे दिसून येत आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक मंदीच्या वादळातही मजबूतच असल्याचे द्योतक हे तिच्या प्रबलतेची साक्ष देतानाच दिसून येत आहे. आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेची ताकद ही तिची ग्राहक आधारित अंतर्गत शक्ती ही असून याच बळावर ती अत्यंत वेगाने पुढे यात असल्याचे अनेक अर्थतज्ञ मंडळीचे मत आहे. "बिघडत्या बाह्य घटकांच्या स्थितीतही भारताच्या वित्त वर्ष २०२२-२३ च्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात अर्थात जीडीपीमध्ये ऑक्टोबरच्या तुलनेत अधिक सुधारणा झालेली आहे. चालू आर्थिक वर्षात २०२२-२३ मध्ये भारताचा जीडीपी वृद्धिदर ६.५% टक्के राहील, असा अंदाज ऑक्टोबरमध्ये व्यक्त करण्यात आलेला होता. जागतिक बँकेने आता तो वाढवून ६.९% टक्के केला आहे. याचाच अर्थ असा की, त्यात जागतिक बँकेने ०.४% नी विकास दरात वाढ केलेली आहे.

जगातील काही नामवंत वर्गवारीत मोडत असलेल्या काही रेटिंग एजंसींनी भारताच्या जीडीपी विकासदरात घट केली होती. मात्रजागतिक बँकेने काही मोजक्याच देशाच्या आर्थिक स्थितीबाबत सकारात्मक अंदाज व्यक्त केलेला आहे. यात भारतीय अर्थ्व्यवस्था ही अग्रक्रमावर राहिलेली आहे. वित्तीय वर्ष २०२१- २०२२ मधील ८.७% टक्के आर्थिक वृद्धीच्या तुलनेत मात्र हा अंदाज अजूनही खूप कमी आहे असे दिसून येत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानेही ७% टक्के जीडीपी विकासदर राहण्याचा अंदाज व्यक्त केलेला आहे.भारतीय अर्थव्यवस्थेबाबत 'नेव्हिगेटिंग द स्टॉर्म' या शीर्षकाखाली आर बी आय या केंद्रीय बँकेने अहवाल सादर केलेला आहे. या अहवालातील स्थितीनुसार जागतिक पातळीवर अनेक देशांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब आहे. या परिस्थितीचा काही प्रमाणात भारतीय आर्थिक विकासावर परिणाम होईल. मात्रइतर देशांच्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्था हे सर्व आर्थिक कुचक्र व त्याचे अनिष्ट परिणाम सांभाळण्यासाठी अधिक चांगल्या स्थितीत तिने स्वतःला तयार केलेले आहे असे समजायला हरकत नाही. येत्या काळात देशातील सध्याची सर्वाधिक चर्चेची असलेली गोष्ट म्हणजे वाढत्या महागाईची समस्या होय. ही महागाई नियंत्रणात येईल असा अंदाज असून देशातील प्रचलित महागाई नियंत्रणात आणण्यासाठी आरबीआयनेही अधिकोषांच्या व्याजदरात वाढ केलेली आहे. याबरोबरच चीनमधील परिस्थितीमुळेही आर्थिक वृद्धिदर घसरत आहे. चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ६.४% टक्क्यांपर्यंत आणण्याचे लक्ष केंद्र सरकार साध्य करेल असे वाटत आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात दिलेले अभिवचन पाळण्यासाठी केंद्र सरकार सावध पावले कशाप्रकारे उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. तसेच महागाईचा दर ७.१% वर येईल, असा अंदाज जागतिक बँकेने व्यक्त केला आहे.चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ६.४% टक्क्यांपर्यंत आणण्याचे लक्ष केंद्र सरकार साध्य करेल तसेच किरकोळ महागाईचा दर ७.१% टक्क्यांवर येईल, असा अंदाज आहे. जागतिक परिस्थिती खराब असुनही भारतीय अर्थव्यवस्था एखाद्या कसलेल्या योध्याप्रमाणे आपली संपूर्ण क्षमता दाखवित आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा आर्थिक पाया अधिकच मजबूत असल्यामुळे इतरांच्या तुलनेत भारताची स्थिती चांगली आहे असे म्हणायला हरकत नाही. या बाबतीत तानो कुआमे, जागतिक बँकेचे भारतातील संचालक अधिक आश्वस्थ असल्याचे दिसून येत आहे. आज घडीला देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर अनेक जागतिक आव्हाने आहेत . या सर्वच आव्हानांचा सक्षमपणे सामना करतांना मात्र जागतिक अर्थव्यवस्थादेखील काहीशी सुस्त आहे, जगातील अनेक देशात कोरोनातर काळात महागाईदेखील प्रचंड प्रमाणात वाढलेलीच आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या ८.७% टक्क्यांच्या तुलनेत यावर्षी भारताचा आर्थिक विकास दर कमीच राहू शकतो. तरीही या सर्व आव्हानांचा सक्षमपणे सामना करुन भारतिय अर्थव्यवस्था ही आपला मजबूत आर्थिक विकास दर साधणार असून जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था ठरेलअसे या अहवालातील मतितार्थ असल्याचे दिसुन येत आहे. या जागतिक मंदीच्या प्रभावाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम केवळ ०.४% टक्केच झालेला तूर्तास दिसून येत आहे. मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेतील विकासदरात १% टक्के कपात झालेली आहे तर इतर देशांवर त्याचा दीडपट परिणाम होताना दिसून येत आहे. या सर्व घडमोडीच्या मागे मात्र अंतिम निष्कर्षावर येतांना मात्रभारतावर केवळ ०.४% टक्के परिणाम जागतिक मंदीचा होत असल्याचे निरिक्षण जागतिक बँकेने नोंदविले आहे. आंतरराष्ट्रीय चलनाचा विचार करतांना भारतीय रुपया मजबूत होणे आवश्यक असून यु. एस. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे चलनीमूल्य मोठ्या प्रमाणावर घटले आहे. मात्रही घट यावर्षी केवळ १०% टक्केच आहे. इतर विकसनशील चलनांच्या तुलनेत रुपया मजबूत आहे. त्यातून भारतीय अर्थव्यस्थेची बळबटी दिसून येते, असे मत जागतिक बँकेचे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ ध्रुव शर्मा यांनी व्यक्त केलेले असून जागतिक विकास दरातील ०.४% होणारी संभाव्य घट हा त्याचा परिणाम आहे. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने विचार करता जीडीपी काय आहे? जीडीपीच्या कार्यकक्षा आहेत? हे पहिले असता सर्व सामन्यांच्या भाषेत देशात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांच्या एकत्रित मूल्यास सकल राष्ट्रीय उत्पन्न अथवा जीडीपी म्हटले जाते. जीडीपीमधून आर्थिक घडामोडींचा स्तर कळतो. कोणत्या क्षेत्रात तेजी अथवा घसरण आली हे त्यातून कळते. भारत सरकारचे सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय जीडीपीचे मूल्यांकन करीत असते. याच जीडीपीच्या संदर्भातील जागतिक बँकेकडून भारतासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. जागतिक बँकेने २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी देशाच्या जीडीपीचा अंदाज सुधारून वाढवलेला आहे. आपल्या चलनविषयक धोरणाच्या बैठकीत आरबीआयने आर्थिक वर्ष २०२३ साठी जीडीपी वाढीचा अंदाज ७% टक्के ठेवला आहे. त्याच वेळी पुढील दोन तिमाहींसाठी आरबीआयचा जीडीपी अंदाज ४.६% टक्के आहे.चालू आर्थिक वर्षात (२०२२-२३) भारताची अर्थव्यवस्था ६.९ टक्के दराने वाढेल, असा अंदाज जागतिक बँकेने वर्तवला आहे. यापूर्वी जागतिक बँकेने भारताची अर्थव्यवस्था ६.५% टक्के दराने वाढण्याचा अंदाज व्यक्त केलेला होता. रशिया-युक्रेन युद्ध आणि जागतिक स्तरावरील कडक आर्थिक धोरणांमुळे गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये जागतिक बँकेने भारताचा विकासदराचा अंदाज ६.५ %टक्क्यांवर आणला होता. तर या पूर्वीचा अंदाज ७.१% टक्के होता, पण आता पुन्हा एकदा जागतिक बँकेने त्यात बदल करून त्यात वाढ केली आहे. आर्थिक विकासाचा वेग काहीसा मंदावलेला असून या तिमाहीत तो १३.५% टक्क्यांवरून थेट ६.३% वर घसरण झालेली दिसून येत आहे. ही थोडीसी चिंताजनक स्थिती जरी असली तरी इतरांच्या दृष्टीने तो नक्कीच चांगला आहे. देशातील किरकोळ महागाई ७.१% टक्के असून वस्तूंच्या चढ्या किमती आणि चलनविषयक धोरण लक्षात घेऊन जीडीपी (GDP) चा हा अंदाज लावण्यात आलेला आहे. जागतिक बँकेने म्हटले की, भारताची अर्थव्यवस्था जागतिक धक्क्यांना चांगल्या प्रकारे हाताळत आहे. या वर्षी सरासरी किरकोळ महागाई ७.१% टक्के असू शकते. हे सर्वच लक्षणीय असून हे रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) समाधानकारक श्रेणीपेक्षा खूप वर आहे.भारतीय अर्थव्यवस्थेसाठी ही विशेष आनंदाची बातमी असून जगात तिसऱ्या स्थानाकडे वाटचाल सुरु आहे. मॉर्गन स्टॅन्लेचा अंदाज असून तो अधिक समाधानकारक आहे. जीडीपी हा अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा मागोवा घेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्वात सामान्य निर्देशकांपैकी एक आहे. जीडीपी विशिष्ट कालावधीत देशामध्ये उत्पादित केलेल्या सर्व वस्तू आणि सेवांचे मूल्य दर्शवते. यामध्ये देशाच्या हद्दीत राहून उत्पादन करणाऱ्या विदेशी कंपन्यांचाही समावेश आहे. जीडीपीचे दोन प्रकार आहेत. वास्तविक जीडीपी आणि नाममात्र जीडीपी. वास्तविक जीडीपीमध्ये वस्तू आणि सेवांचे मूल्य आधार वर्षाच्या मूल्यावर किंवा स्थिर किंमतीवर मोजले जाते. सध्या जीडीपीची गणना करण्यासाठी आधारभूत वर्ष २०११-१२ आहे. म्हणजे २०११-१२ मधील वस्तू आणि सेवांच्या दरांनुसार गणना केली गेली. तर नाममात्र जीडीपी वर्तमान किमतीवर मोजला जातो. या सर्व बाजू ध्यानात घेवून आज भारतीय अर्थव्यवस्था ही वेगाने पुढे जात आहे. ती जागतिक मंदीच्या वादळातही स्थिर असल्याचे द्योतक तिच्या बळकटीमध्ये आहे.

**( लेखक जीवन विकास महाविद्यालय. देवग्राम येथे पदवी महाविद्यालयाला उपप्राचार्य असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य आहेत )**

## कर्मयोगी संत गाडगे महाराज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेल हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली.**

लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खरट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या पप्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवरूषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६६ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# तळीरामांचा 'बळी'कोण घेतोय ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**बिहार राज्यात विषारी दारू प्याल्याने जवळपास ७८ जणांचा बळी गेला आहे.ही संख्या वाढतच चालली आहे.ही घटना एकाच ठिकाणी घडली नाही.राज्यातील छपरा - ७१, सिवान-५ आणि बेगुलसराय येथे- २ मृत्यू पावले आहेत.मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी राज्यात दारूबंदी लागू केली.तो निर्णय चुकीचा नाही.पण बंदी नंतरही राज्यात विषारी दारू मिळते! यात गरीब माणसांचा बळी जातो.त्याला जबाबदार कोण?असा भाजपाचा प्रश्न करत आहे.यावरून भाजपाने विधानसभेत सरकारला धारेवर धरले व गोंधळ घातला?राज्यात दारूबंदी अपयशी ठरली आहे. तसेच मुख्यमंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी केली.भाजपा या घटनेचे राजकारण करत आहे.राजकारणात 'कुरघोडी'चा खेळ होणारच!मुख्यमंत्री नितीशकुमारने भाजपाला धोका दिलेला आहे.**

भाजपा आता विरोधी पक्ष आहे. तेंव्हा भाजपाला त्यांना घेरण्याची संधीच मिळाली. पण विधानसभेत मुख्यमंत्री नितीशकुमार भाजपावर का भडकले? त्यांनी डोळे वटावले ! एरव्ही शांत स्वभावाचे असलेले नितीशकुमार यांचा राग अनावर का झाला? त्यांनी या घटनेची उच्चस्तरीय चौकशी समिती व दोषीवर कारवाई करावयास तयारी दाखवली असती तर प्रकरण वाढले नसते! पण त्यांनी घटनेबाबत असंदेनशिलता दाखविली आहे. त्यांनी 'जो दारू पितो तो मरणारच?असे विधान केले इतकेच नव्हे आर्थिक मदत देण्यास नकार दिला आहे. म्हणे! आम्ही म. गांधींजींच्या विचारावर चालत आहोत. त्यांच्यात नैतिकता असती तर त्यांनी राजीनामा दिला असता. त्यांनी सत्तेसाठी ज्या पक्षाशी मैत्री केली? त्यात किती गांधी विचाराचे आहेत? या घटनेत सरकारची नैतिक जबाबदारी नाही काय? या घटने- नंतर दारूबंदी यंत्रणा जागी झाली दिसतेय. त्यांच्याच धाडीत अनेक ठिकाणी विषारी दारूचे अड्डे सापडत आहेत. या घटनेची गंभीरता लक्षात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग बिहार राज्यात जाऊन चौकशी करणार आहे. यात भाजपा राज्यात विशेषतः मध्यप्रदेश,गुजरात राज्यात विषारी दारूमुळे मृत्यू होण्याची संख्या अधिक आहे,असे टीका उपमुख्यमंत्री तेजस्वी म्हणाले. भाजपाने सुध्दा दुसऱ्याच्या घरावर दगड मारताना आपले घर काचेचे आहे,हे लक्षात ठेवावे. पण यादवांनामृत्यूची तुलना करून राज्यातील दारूकांडवर पांघरून घालावयाचे आहे काय? यात राजकारण दोन्ही बाजूने केले जात आहे. बिहार सरकारला विषारी दारूने माणसे मेल्याची चिंता वाटत नाही. याबाबत नितीशकुमारला प्रतिष्ठा प्रश्न केलेला आहे. यात राज्य शासन व प्रशासनाचे अपयश आहे. यावरून नितीशकुमार विरूध्द भाजपा असा राजकीय संघर्ष सुरू झाला आहे. यात सरकारने उकळ्या-पाकळ्या काढण्यापेक्षा गरीब कुटुंबाला मदत करावी,ही सर्व सामन्यांची अपेक्षा आहे.

दारूचा इतिहास पहाता! पुरातन काळापासून "मदिरा'चा उल्लेख आहे. !ऋग्वेदात दारू पिणे निषिध्द मानल गेल आहे. तसेच राजा- महाराजांच्या दरबारात पाहुण्यांचे आदरतिथ्य म्हणून 'जलपाण'(मद्य) शाही स्वागत केल जात असे. दारूचा जन्म सुमारे नऊ हजार वर्षापूर्वी चीनमध्ये झाला, अशी माहिती आहे. भारतात १९३० मध्ये अल्लाउद्दीन खिलजी मोगल सम्राट अकबर यांनी आपल्या राज्यात दारूबंदीचा केली होती. इंग्रजांनी तर दारू प्राशनाला प्रतिष्ठा दिली. त्यांनी प्रथम १७६९ मध्ये दारूवरअबकारी कर लागू केला. म. गांधींनी १९२० मध्ये दारू बंदीची मागणी केली होती. स्वातंत्र्यानंतर १९१८ अबकारी कायद्यात सुधारणा केली १९३९ व १९५४ मध्ये देशात दारूबंदी लागू गेली होती. काँग्रेस सरकारने तर गांधीजींची दारूबंदी विचारालाच तिलांजली दिली आहे. खर तर! स्वातंत्र्यानंतर प्रत्येक गावात वाचनालय सुरु करण्या- ऐवजी दारूची दुकाने उघडली गेली. लोकांना व्यसनाधीन बनविले गेले!भारतीय घटनेत कलम ४७ मध्ये दारूबंदीचा उल्लेख आहे. राज्यात संपूर्ण मद्यबंदी करणे घटनेच्या कलम १९(६) उल्लघंन आहे. याबाबत दारूबंदीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. तेंव्हा न्यायालयाने २०१६ मध्ये 'दारूबंदी आणि मूलभूत अधिकार एकत्र येत नाहीत' असा निर्णय दिला.

राष्ट्रीय गुन्हा नोंद विभागाच्या २०२१ नोंदीनुसार (NCRB) देशात विषारी दारुमुळे उत्तर प्रदेशच्या अलीगढमध्ये १३७ लोक मृत्यू पावले.



त्यानंतर पंजाबमध्ये१२७ तर मध्यप्रदेश १०९ बिहारमध्ये २ जण मृत पावले. या दोन राज्यात भाजपाची सत्ता आहे. बिहारमध्ये दोन पण मृत पावले. पण सुर्देवाने आंध्रप्रदेश,महाराष्ट्र, गोवा,या राज्यात विषारी दारूने मृत्यूची एकही नोंद नाही. हीअधिकृत नोंद असली. अति मद्य प्राशनाने दहा टक्के लोकांना गभीर आजार हातात व त्यात ते मरतात. त्याची कोठेही नोंद नाही. घटनेत मादक पेये आरोग्यास हानीकारक असल्याने त्याबाबत राज्यांना निर्णय अधिकार देण्यात आले आहेत. देशात काही राज्यांनी याचे पालन केले,तर अनेक राज्यांनी महसुली उत्पन्नाचे साधन म्हणून दारू नियमात सुधारणा करून दारू विक्रीला खुलीआम मुभा दिली आहे. पुरोगामी महाराष्ट्राने काँग्रेसने १९६० मध्ये दारूवरील निर्बंध हटविले होते. तेंव्हा बॉम्बे प्रोव्हिजन अक्ट १९४९ महाराष्ट्र व गुजरातने स्विकारला. आता या कायद्यात सुधारणा केल्या आहेत. आता गावोगावी दुधाऐवजी दारूचा महापूर वाहतोय!यामुळे तरूण पिढी उध्वस्त होत आहे. याचे राज्य सरकारांना याचे काहीच देण- घेण नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतात अति मद्यसेवनाने तासाला एकाचा मृत्यू होतो. भारतात दारूने वर्षाला तीन लाख मृत्यू पावतात. यात तरूणांची संख्या अधिक आहे. देशात बिहार, गुजरात, नागालँड, लक्षव्दिप या राज्यांनी दारूबंदी आहे. गुजरात सरकारने तर दारूबंदी कायद्याचे उल्लंघन करण्यास मृत्यूदंडाची शिक्षेची तरतूद केली आहे. गोवा सरकारने नुकतेच 'बीच'वर दारू पिण्यावर बंदी घातली आहे. आंध्र प्रदेश,हरियाना केरळ राज्यांनी दारूबंदीचा निर्णय घेतला होता. नंतर राज्यांनी आर्थिक फटका बसल्याचे कारण देत दारूबंदीचा निर्णय मागे घेतला. तेंव्हा १९७५ फाईव्ह राईल्स चित्रपटातील 'जब से सरकर ने नशाबंदी तोड दी,कोई मनो, या ना मानो, हमने पिनी छोड दी' हे गाणे गाजले होते. चित्रपटात मद्यपान व धुम्रपान दाखविण्यावर निर्बध आहेत. पण असे दृश्य दाखवित असताना ते आरोग्यास हानीकारक अशी टीप टाकावी अशी पळवाट काढली गेली. दिल्लीत आम आदमी सरकारचे' दारू घोटाळा प्रकरण गाजतेय!गांधीवादी विचाराचे व ज्येष्ठ स्वांतत्र्य सैनिक अण्णा हजारे यांच्या चळवळीतून केजरीवाल यांनी राजकीय फायदा घेतला. 'आम्ही देशात भाजप- काँग्रेसपेक्षा वेगळे राजकारण करू"असे,म्हणणारे केजरीवाल आता इतर पक्षाप्रमाणे भ्रष्टाचाराचे,दारू धोरणाचे कट्टर समर्थक निघाले आहेत.

पुरोगामी महाराष्ट्रात दारूने थैमान घातलेले आहे. याच गांधीजीचे विचार मनणाऱ्या पक्षाला लाज वाटत नाही. म. गांधी विचाराचा वापर सत्तेसाठी केला जातोय!सामान्य जनतेच्या हितासाठी नाही. एकीकडे सर्रापणे दारू विक्री तर दुसरीकडे दारूच्याविरोधी जनजागृती करणारे विभागही होता. ही दुहेरी नीती काँग्रेस सरकारची राबविली होती. आज राज्यात वर्धा, गडचिरोली या दोनच जिल्ह्यात दारूबंदी आहे. चंद्रपूर दारूबंदी करण्यात आली होती. पण नंतर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे कारण देत दारूबंदी मागे घेतली गेली. पण तेथे दारूबंदी अवैध दारू मिळते. मुंबईत २००१ ड्रममधील दारू पिल्याने १२५ जण मृत्यू पावले. त्यानंतर काचेच्या बॉटलीत दारू दिली जात आहे. महाराष्ट्रातील प्रसिध्द नाटककार राम गणेश गडकरी यांनी १९१७ मध्ये दारूच्या दुष्परिणावर 'एकच प्याला' नाटक लिहिले. या नाटकातील तळीरामाचा संवाद असा, 'दारू पिणारा कधी खोट बोलत नाही,कारण त्याला खोट रचून सांगताच येत नाही. तो कोणीची चाडी करत नाही. का?आपण बोललो याची आठवण राहत नाही. तो लोकांचा विश्वासघात करत नाही. का? लोक त्याचेवर विश्वास ठेवत नाहीत'करोनाच्या काळात महाविकास आघाडीने जीवनावश्यक वस्तू म्हणून काय? राज्यात दारूंचे दुकाने उघडण्यास प्राधान्य दिले तेंव्हा तळीरामांच्या रांगा लावल्याचे चित्र पहावयाला मिळाले. यात राज्य शासनाला २०२०-२०२१ मध्ये १७ हजार ५०० कोटी रूपायाचा महसूल मिळाला. राज्यातील मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर, विभागा- पेक्षा औरंगाबाद विभागाने ५८१२. १३ कोटी रूपये सर्वाधिक महसूल दिला आहे. नागपूर विभागात सर्वात कमी ७३७. ८८ कोटी महसूल मिळालेला आहे. ३१ डिसेंबरला येथेच्छ दारू ढोसा! त्यासाठी परवाना सुध्दा लागत नाही. राज्यात परवाने व दारू विक्री याचा ताळमेळ नाही. दारू कोणाला विकत घेता येते! येथे परवाना की नाही? विचारले जात नाही. वास्तविक परवाना दारू विकत घेणे व पिणे गुन्हा पण विना परवाना व्यक्तीला दारू विकणे कायद्याने गुन्हा नाही. महाराष्ट्रालाअवैध मार्गाने उत्पन्न मिळावयाचे का? मग गोव्याप्रमाणे दारू विक्रेत्याला दारूची बॉटल देताना एक दिवसाचा परवाना द्या !करोडो रूपये आणि खंडणीही मिळेल! राज्यात दारूला,भ्रष्टाचाराचा प्रतिष्ठा दिली जातेय! स्वातंत्र्यवीर सावरकाराचा हिंदु देवतांचा,राष्ट्राचा व भारतीय सैनिकाचा अवमान करण्याच्या विरोधात महाविकास आघाडी मोर्चा काढणार नाहीत. महापुरूषांचा सर्वांना प्रत्येक पक्षाला आदर आहे. ते महाविकास आघाडीची मक्तेदारी नाही. राज्यात अनेक प्रश्न आहेत, दारूचा महापूर वाहतोय! यावर बोला!नवीन वर्षाची सुरूवात तर मुक्त दारूने होते! तरूणांसाठी रात्रभर बार चालू ठेवण्यास सरकार परवानगी देते. तसेच राज्यात निवडणुकीच्या सर्वात अधिक दारू विक्री केली जाते. राज्य उत्पादन शुल्क विभागावर जिल्हाधिकारी प्रशासनाची नियंत्रण असते. त्यांच्या परवानगीशिवाय कोणतेही निर्णय होत नाहीत. मग निवडणूक काळात दारूची विक्री अधिक कशी काय होते?दुसरीकडे मात्र दि. २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीच्या एक दिवस दाचे दुकाने बंद ठेऊन आदरांजली वाहली जाते! गांधीजींची विचारांची थट्टाच आहे. राज्य शासनाने दारूला प्रतिष्ठा दिली आहे. श्रीमंतांनी दारू प्याला तर तो प्रतिष्ठित व मोठा माणूस समजला जातो. पण गरीब, श्रम करणारा मजूर दारू पिला तर त्याला व्यसनी,दारूड्या म्हंटल जात! देशाचा अमृत महोत्सव साजरा करत असताना दारूबंदी करू शकलो नाही. ज्या राज्यात दारूबंदी तेथे दारूची तस्करी व विक्री मोठ्या प्रमाणात होत असते. यात बड्या मंडळीचा हात असतो,त्याला प्रशासन अधिकाऱ्याला लाच घेऊन साथ देतात. त्याशिवाय अवैध दारू विक्रीचा व्यवसाय चालत नाही. बिहार सरकार अवैध दारू तस्करी करणाऱ्यांचा व त्यांना साथ अधिकाऱ्याचा शोध घेत नाही. दारू रिचविण्यात पुरोगामी महाराष्ट्रात यात मागे नाही. राष्ट्रीय कुटुंब कल्याण २०१९-२० च्या सर्वेक्षणानुसार देशात महाराष्ट्र दारू पिणाऱ्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. नांदेड जिल्ह्यात भाजपाचे खा. प्रताप चिखलीकर यांचे (माझेही) चिखली आहे. या गावात पिणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. यात अनेक यातरूण अनेक मृत्यू पावले. बारूळचा दारू विक्रेता आजूबाजूच्या खेड्यात बॉक्सने दारूने पुरवठा करतो. चिखली दारूड्यांना उस्माननगर पोलिस भितात! कारण त्यांचे कारवाई केली जात नाही. नांदेड शहरात 'प्रि पेड बार'म्हणून वाईन शॉपची (एल-२) परवाना नसताना. ते खुलेआम दारूची विक्री करत आहेत. हे बारमालक (एल-३) परवान्याचे उल्लंघन करत आहेत. त्यात एम आर,पी पेक्षा वीस टक्के अधिक पैसे तळीरामा- कडून घेतले जात आहेत !या ऑनमनीत किती वाटेकरी आहेत?यातून 'तळीरामांना लुटले तरी कोण विचारणार? हाक ना बोंब! हा ऑनमनी पैसा राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होत नाही. नांदेडचे जिल्हाधिकारी प्रशासन दिवसा आंधळे बनले आहे का?दारू,सिगारेट हे विष आहे,ते आरोग्यास हानीकारक आहे तरी शासन दारूबंदीचा निर्णय घेत नाही. कारण राज्य शासनाला दारू,पेट्रोल यातून अधिक कमाई होत असते. यात माणसे मेले तरी चालतील पण राज्य कार्यकर्ते जगले पाहिजेत. गुजरातवर लक्ष्य करणारे काँग्रेस नेते पुरोगामी महाराष्ट्रात दारूबंदीची मागणी करत का नाहीत? दारूबंदीत विषारी विक्री करतो त्याला फाशी द्या ना! बिहारच्या गरीब माणसाला विषारी पिली व तो मेला त्याला गुन्हेगार ठरविले जात आहे. यात मृत कुटुंबाचा दोष काय?दारूने बळी'घेण्यास शासन व्यवस्था जबाबदार नाही काय?देशात दंगलीत मृत पावलेल्या कुंटुबाना आर्थिक मदत दिली जाते. पण बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार ही दुर्घटना मानत नाहीत. या गरीब कुटुंबाना मदत न करण्याची भूमिका घेत आहेत. त्यांची हट्टवादी भूमिका घेत आहेत ती माणसुकीला मुळीच शोभणारी नाही.

# पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांचे पीएम मोदींवर विषारी वक्तव्य



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांनी गुजरात दंगलींबाबत पंतप्रधान मोदींविरोधात जहरी विधान केलं आहे. बिलावल यांनी हे विधान अशावेळी केले आहे, जेव्हा त्यांना इम्रान खानचा तीव्र विरोध होत आहे. बिलावलने आपल्या आईच्या काश्मीर कार्डाप्रमाणे गुजरात दंगलीचे कार्ड खेळल्याचे मानले जात आहे.बिलावल भुट्टो यांनी गुजरात दंगलींबाबत पंतप्रधान मोदींविरोधात अपमानास्पद वक्तव्य केलं आहे असे अवमानकारक विधान करताना पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी आपल्या पदाची प्रतिष्ठा पणाला लावून ठेवली.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताला घेरण्यात अपयशी ठरलेले पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल झरदारी भुट्टो यांनी आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वैयक्तिक हल्ला चढवला आहे. संयुक्त राषट्रसंघा मध्ये सर्व मर्यादा ओलांडत पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पीएम मोदी आणि परराष्ट्र मंत्री यांच्यावर आरोप केला.भारताचे नसून आर एस एस चे पंतप्रधान असल्याचे आणि परराष्ट्र मंत्री असल्याचे बेजबाबदार वक्तव्य करत असल्याचे म्हंटले .बिलावल भुट्टोना आम्ही सांगू इच्छितो की पंतप्रधान नरेन्द्र मोदी हे संपूर्ण भारताचे पंतप्रधान आहेत. ते एका जाती, धर्माचे नाही. त्यांना जनतेनी निवडून दिलं आहेत .भारतात लोकशाही आहे.इथ जनमताचा आदर होत असतो.येथील सरकार लोकनियुक्त आहे.**

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांच्यावर न्यूयॉर्कमध्ये केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने या संदर्भात एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांचे विधान 'असभ्यते'ने भरलेले आहे. पाकिस्तानने आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, बिलावल भुट्टो यांच्या या टिप्पण्या पाकिस्तानसाठीही नवा नीचांक आहेत. १९७१ मधील हा दिवस पाकचे परराष्ट्र मंत्री स्पष्टपणे विसरले आहेत, जो पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी जातीय बंगाली आणि हिंदूंच्या विरोधात केलेल्या नरसंहाराचा थेट परिणाम होता. पाकिस्तानवर हल्ला करताना परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, पाकिस्तान हा ओसामा बिन लादेनचा शहीद म्हणून गौरव करणारा देश आहे. एवढेच नाही तर लखवी, हाफिज सईद, मसूद अझहर, साजिद मीर आणि दाऊद इब्राहिम यांसारख्या दहशतवाद्यांचे हे आश्रयस्थान आहे.

पाकिस्तानातील दहशतवादी अजमल कसाबच्या गोळ्यांपासून २० गर्भवती महिलांचे प्राण वाचवणाऱ्या मुंबईतील नर्स अंजली कुलथे यांनी यू एन एस सी मध्ये दिलेली साक्ष पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अधिक गांभीर्याने ऐकायला हवी होती, असेही परराष्ट्र कार्यालयाने म्हटले आहे. त्या दहशतवादी घटनेतील पाकिस्तानची भूमिका स्पष्ट करण्यात त्यांना अधिक रस असल्याचे त्यांनी यू एन एस सी मध्ये केलेल्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने स्पष्टपणे सांगितले की पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री भुट्टो यांची निराशा त्यांच्याच देशात कार्यरत असलेल्या दहशतवादी कारखान्यांच्या मास्टरमाइंडकडे निर्देशित केली जाईल. ज्यांनी आपल्या देशाच्या धोरणात दहशतवादाचा समावेश केला आहे. पाकिस्तानने आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे.

बिलावल भुट्टो यांनी यू एन एस सी काय म्हंटले.?

ओसामा बिन लादेन मेला आहे, हे मी भारताला सांगू इच्छितो, पण गुजरातचा कसाई जिवंत आहे आणि तो भारताचा पंतप्रधान आहे. बिलावल भुट्टो संयुक्त राष्ट्रांच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी न्यूयॉर्कमध्ये आहेत. भुट्टो पुढं म्हणाले की, मोदी पंतप्रधान (पंतप्रधान मोदी) होईपर्यंत त्यांच्यावर अमेरिकेत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती. हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पंतप्रधान आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे परराष्ट्रमंत्री आहेत. आरएसएस म्हणजे काय? हिटलरच्या 'एसएस'पासून आरएसएसने प्रेरणा घेतल्याचं वादग्रस्त विधानही बिलावल



भुट्टो यांनी केल.पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारतावर राजकीय हल्ले करण्यात गुंतले आहेत. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांनी गुरुवारी सांगितले की आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद प्रामुख्याने जबाबदार आहे. सुरक्षा परिषदेच्या छत्राखाली बहुपक्षीय उपाय शांतता वाढवण्यासाठी आणि संघर्ष सोडवण्यासाठी सर्वात प्रभावी दृष्टीकोन प्रदान करतात. नाव न घेता, भुट्टो यांनी जम्मू आणि काश्मीरच्या संदर्भात सांगितले की वादाचे पक्ष बहुपक्षीय प्रक्रियेचे समर्थन करू शकत नाहीत, बहुपक्षीय सुधारणांचे समर्थन करू शकत नाहीत आणि दुसऱ्या दिवशी द्विपक्षीय मार्गाचा आग्रह धरतात आणि शेवटी एकतर्फी कारवाई करतात.इतकेच नाही तर बिलावल भुट्टो यांनी न्यूयॉर्कमध्ये पत्रकार परिषदेत सर्व मर्यादा ओलांडल्या आणि पंतप्रधान मोदींवर वैयक्तिक हल्ला केला. पाकिस्तानने ९/११ चा मास्टरमाइंड ओसामा बिन लादेनला आश्रय दिल्याच्या भारतीय परराष्ट्रमंत्र्यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी पंतप्रधान मोदींविरोधात वादग्रस्त विधान केले. ते म्हणाले की, पंतप्रधान होण्यापूर्वी अमेरिकेने त्यांच्या प्रवेशावर बंदी घातली होती. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री असे संबोधले होते. भारत सरकारचा हिटलरच्या विचारसरणीवर विश्वास असल्याचेही ते म्हणाले. बिलावल भुट्टो यांनी पुन्हा एकदा त्यांची आई बेनझीर भुट्टो यांची खतरनाक चाल खेळली आहे.

संयुक्त राष्ट्रात दहशतवादामुळे वाईटरित्या घेरलेले पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांनी गुजरात दंगलींबाबत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अवमानकारक वक्तव्य केले आहे. असे अवमानकारक विधान करताना पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी आपल्या पदाची प्रतिष्ठा पणाला लावली. बिलावल यांचे हे विधान भारत आणि पाकिस्तानमधील संबंध सुधारण्याच्या सर्व प्रयत्नांना मोठा धक्का मानला जात आहे. इम्रान खानच्या जबरदस्त शक्तीप्रदर्शनाने घाबरलेल्या बिलावल भुट्टो यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी आणि भारताविरोधात विषारी वक्तव्य करून त्यांची आई आणि पाकिस्तानच्या माजी पंतप्रधान बेनझीर भुट्टो यांची धोकादायक युक्ती सुरू केल्याचे मानले जात आहे.

# होऊया रे मानव सारे; मानवी ऐक्य साधुया रे!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**शेजारी शेजारी देशांत सीमावाद, दहशतवाद, वर्ण, जात, धर्म, भाषा, संस्कृती यावरून वाद उफाळून जगात अराजकता व अशांती बळावू नये. प्रत्येक देश यथोचित प्रगती पथावर अग्रेसर रहावा. कोणीही कोणाचे हेवेदावे न करता प्रेम, बंधुभाव वृद्धिंगत व्हावे, म्हणून दरवर्षी २० डिसेंबर हा जगभरात आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. विविधतेतील एकतेचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस साजरा केला जावू लागला. सदर बोधवर्धक लेख अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दशैलीतून जरूर वाचा...संपादक.**

मानव एकता म्हणजे मानवी ऐक्य अर्थात माणसांमाणसात एकजुट असणे होय. लोकांना एकमेकांशी बांधून ठेवणाऱ्या समाजात एकता आणि बांधीलकीची मानसिक भावना निर्माण करणाऱ्या सामायिक हितसंबंधांची व उद्देशांची जाणीव म्हणून एकता परिभाषित केली जाते. यूएन- राष्ट्र संघ संस्था म्हणते की एकता ही संकल्पना नेहमीच संस्थेचा एक परिभाषित भाग आहे. युनायटेड नेशन्सच्या मते, "संयुक्त राष्ट्रांच्या निर्मितीमुळे शांतता, मानवी हक्क, सामाजिक व आर्थिक विकास यांना चालना देण्यासाठी जगातील लोक आणि राष्ट्रे एकत्र आकर्षित झाली. संघटनेची स्थापना तिच्या सदस्यांमधील ऐक्य आणि सुसंवादाच्या मूलभूत तत्त्वावर करण्यात आली, जी सामूहिक सुरक्षिततेच्या संकल्पनेतून व्यक्त केली गेली. ती आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी सदस्यांच्या एकतेवर अवलंबून आहे. यापूर्वीच आध्यात्मिक विचारधारा प्रवाहित करणारे संत निरंकारी मिशनचे मानव एकता, विश्वशांती, विश्वबंधुत्व हे उपक्रम यशस्वीरित्या राबविले व अजूनही राबवतच आहे. मिशनचे युगदृष्टा सद्गुरू संतशिरोमणी हरदेवसिंहजी महाराजांनी विश्वबंधुत्वासाठी मानवामानवात ऐक्य निर्माण व्हावे, यासाठी समजावितात-

***"मानव के कर्मों से धरती बसती और उजड़ती हैं|***
***मानव के कर्मों से दुनिया बनती और बिगड़ती हैं|***
***समदृष्टि समभाव से जीना सबको जब आ जायेगा|***
***प्यार ही बरसेगा हर सू फिर वैर नज़र न आयेगा|***
***सन्तमति को धारण करके सुन्दर हम व्यवहार करें|***



***कहे 'हरदेव' मिलवर्तन से सुखमय कुल संसार करें|"***
(सम्पूर्ण हरदेव बाणीः पद - २३५ः ओळ क्र.१, २, ७, ८, ९ व १०)

आंतरराष्ट्रीय मानवी एकता दिवस हा शाश्वत विकास अजेंडावर आधारित आहे, जो स्वतःच लोकांना गरीबी, भूक आणि रोग यासारख्या दुर्बल पैलूंमधून बाहेर काढण्यावर लक्ष केंद्रित करतो. मिलेनियम डिक्लेरेशनच्या अनुषंगाने एकवीसव्या शतकातील आंतरराष्ट्रीय संबंधांचे एक मूलभूत मूल्य म्हणून एकता ओळखली जाते; ज्याच्या अंतर्गत ज्यांना कमीत कमी आणि ज्यांना सर्वात जास्त फायदा होतो, त्यांना मदतही होते. विज्ञानाच्या बळावर मानवाने अगणित प्रगती साधली आहे. सुखचैनीच्या वस्तू, यंत्रे, अवजारे तयार केलेल्या आहेत. काबाडकष्ट, शारीरिक श्रम करणे कमी झाले आहे. चंद्र व मंगळावर स्वारी करून तेथील वातावरणाचा शोध घेतला व तेथे तो आपले वास्तव्य- संसार थाटण्याच्या बेतात आहे. तरीही तो अशांत व बेचैन आहे. त्यासाठी त्यावर उतारा सांगतात, तो म्हणजे अध्यात्मिक ज्ञानाचा! वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात-

***"शांती सुखाचे मारग बरवे!***
***आपण तरोनि दुजा तारावे!!***
***तोडिल पाश यमाचा, यमाचा!***
***भक्ती विन उद्धार नाही कुणाचा!!"***

आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवसाचे महत्त्व असे- विविधतेत एकता दाखवण्यासाठी
विविध सरकारांना आंतरराष्ट्रीय करारांची आठवण करून देणे, लोकांना एकतेचे महत्त्व पटवून देणे, शाश्वत विकासासाठी लोकांना व सरकारांना प्रेरित करणे, गरिबी निर्मूलनासाठी नवीन मार्ग शोधणे, लोकांना गरिबी, भूक, रोग यांसारख्या समस्यांमधून बाहेर काढणे. हे जरी खरे असले, तरी मानवाने तयार केलेल्या विनाशकारी शस्त्रास्त्रे, शक्तीशाली बॉम्ब, आधुनिक औजारे यांचा दुरुपयोग करून तो इतर देशासह स्वतःचाही आत्मघात करू शकतो. जगाला पुनःश्च महायुद्धाच्या खाईत ढकलू शकतो. यांवर प्रतिबंध यावा, हाही उद्देश आहे. संत निरंकारी मिशनचे महान ग्रंथकार संतश्रेष्ठ शहंशाह अवतारसिंहजी महाराज विश्व मानव एकतेची गरज विषद करताना सांगतात-

"अज साइंस ते साइंसदारानां बड़े बड़े बणाये बम्ब|
इक्को बम्ब नाल दुनियां मर जाये ऐसे ऐसे आये बम्ब|
मुरदे नूं जो जिन्दगी बख्शे मुरशद बणाई ए|
कहे अवतार मैं मरदे मरदे इस तों जिन्दगी पाई ए|"
(सम्पूर्ण अवतार बाणीः पद क्र. ३४०ः ओळ क्र.१, २, ५, व ६)

दरवर्षी हा दिवस देशांदेशात आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस साजरा करतात. असा जागतिक स्तरावर हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश्य असा, की लोकांच्या विविधतेमधील एकतेचे महत्त्व स्पष्ट करत जागरूकता पसरविणे होय. हेल्प फॉर ह्यूमेन रिसर्च अँड डेव्हलपमेंट या संस्थेने भारतीयांनाही एकतेच्या सूत्रात बांधण्यास पुढाकार घेतला आहे. दि.२२डिसेंबर २००५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने मानव एकता संदर्भात एक निर्णय घेत दरवर्षी २० डिसेंबरला आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस घोषित करण्याचा निर्णय घेतला. फेब्रुवारी २००२मध्ये दारिद्र्य निर्मूलनासाठी युएनडीपीचा जागतिक एकता कोष स्थापन करण्यात आला आहे. नवीन शाश्वत विकास उद्दीष्टे- एसडीजी पूर्णपणे लोक आणि ग्रहावर केंद्रित आहे, ज्यात मानवाधिकारांना पाठबळ दिले जात आहे. हे शक्य होण्यास संतश्रेष्ठ हरदेवसिंहजी महाराज बजावतात-

"मानवास मानव प्रिय असावा!
एकमेकांचा आधार बनावा!!" दारिद्र्य, उपासमार आणि रोगराई यामधून लोकांना बाहेर काढण्याच्या निर्धारासाठी वैश्विक भागीदारीने समर्थित आहे. त्यादृष्टीने जागतिक सहकार्य आणि एकात्मतेची पायाभरणी केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून जगभरात आंतरराष्ट्रीय मानव एकता दिवस साजरा करतात.

# वाढत्या ऊर्जा गरजांमध्ये सौरऊर्जा सशक्त पर्याय

आधुनिक केसरी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

**भारत हा भौगोलिकदृष्ट्या उष्णकटिबंधीय देशांपैकी एक आहे, जिथे वर्षातून तीनशे दिवसांपेक्षा अधिक दिवस सूर्यप्रकाश असतो. साहजिकच, यामुळे भारत सौरऊर्जेच्या बाबतीत एक मजबूत देश बनू शकतो. मात्र, आजतागायत या दिशेने पाहिजे तशी ठोस व्यवस्था झालेली नाही. परंतु दिवसेंदिवस पारंपारिक माध्यमातून वीज निर्मिती करणे महाग होत चालली आहे, त्यामुळे सौरऊर्जा हा एक चांगला सशक्त पर्याय म्हणून उदयास येत आहे. विशेष म्हणजे 2035 पर्यंत देशातील सौरऊर्जेची मागणी सात पटीने वाढण्याची शक्यता आहे. भारताची लोकसंख्या लवकरच चीनपेक्षा जास्त होईल. अशा स्थितीत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशातील विजेच्या गरजेमध्ये सौरऊर्जा अधिक प्रभावी ठरेल. वस्तुस्थिती अशी आहे की पर्यावरणाच्या दृष्टिकोनातूनही सौरऊर्जा हा एक चांगला पर्याय आहे.**

भारताच्या ऊर्जेच्या मागणीचा मोठा भाग औष्णिक ऊर्जेद्वारे भागवला जातो, जी जीवाश्म इंधनांवर अवलंबून आहे. तसे पाहायला गेल्यास जगभरात केवळ ऊर्जा उत्पादनातून दरवर्षी सुमारे वीस अब्ज टन कार्बन डायऑक्साइड आणि इतर प्रदूषक उत्सर्जित होतात, जे हवामान बदलासाठी जबाबदार आहेत. साहजिकच सौर उर्जेमुळे कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होते. सौरऊर्जा ही अशी स्वच्छ ऊर्जा आहे जी पारंपारिक ऊर्जा स्रोतांना उत्तम पर्याय आहे. भारत ही एक विकसनशील अर्थव्यवस्था असून ऊर्जेच्या विविध पर्यायांचा शोध घेत आहे. औद्योगिकीकरण, शेतीसह शहरीकरण आणि दैनंदिन विजेच्या गरजांमुळे भारतासमोर नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. लोकसंख्येची घनता जास्त असल्याने सौरऊर्जा उभारण्यासाठी जमिनीची उपलब्धता कमी आहे, त्याचबरोबर पारंपरिक ऊर्जेतून आवश्यक प्रमाणात पुरवठा करणे शक्य होत नाही. मात्र सौरऊर्जा ही केवळ आनंददायी बाब नसून त्यातून निर्माण होणारा कचरा हे भविष्यातील आव्हान असू शकते. ई-कचरा, प्लास्टिक कचऱ्यासह अनेक कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्याबाबत सध्या भारतापुढे अनेक समस्या आहेत. असा अंदाज आहे की 2050 पर्यंत भारतातील सौर कचरा सुमारे 18 लाख टन होण्याची शक्यता आहे. या सर्वांशिवाय भारताला आपल्या देशांतर्गत उद्दिष्टांना प्राधान्य देणे आणि जागतिक व्यापार संघटनेशी (WTO) असलेली वचनबद्धता यांच्यातील आव्हानांचाही सामना करावा लागत आहे. सध्या केंद्र आणि राज्य सरकारकडून सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनाही राबवल्या जात आहेत. अतिशय कमी खर्चात सोलर पॅनल उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अनुदानाचीही तरतूद आहे. पण भारतातील प्रत्येक पाचवा व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली आहे हेही समजून घेतले पाहिजे. झोपडपट्ट्यांपासून ते कच्च्या घरांपर्यंतची संख्याही येथे मोठी आहे. 2011 च्या जनगणनेनुसार देशातील साडेसहा कोटी लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात आणि करोडो लोक बेघर आहेत. अशा परिस्थितीत सौर पॅनेल बसवणे हे एक मोठे आव्हान आहे. भारत सरकारने 2022 पर्यंत दोन कोटी पक्की घरे देण्याचे आश्वासन दिले होते. ही घरे उपलब्ध झाली तर कदाचित सोलर पॅनल बसवायलाही त्यांचा उपयोग होईल. सरकारने 2022 च्या अखेरीस 175 गीगावॅट (GW) अक्षय ऊर्जा क्षमतेचे लक्ष्य ठेवले आहे. यामध्ये 60 गीगावॅट (GW) पवन उर्जा, 10 गीगावॅट (GW) बायोमास आणि फक्त 5 गीगावॅट (GW) जलविद्युत, तर 100 गीगावॅट (GW) एकट्या सौर उर्जेचा समावेश आहे. मात्र, ज्या गतीने विजेची गरज वाढत आहे, त्या प्रमाणात ती कालांतराने अनेक पटींनी वाढत ठेवावी लागेल. पण हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा सौर पॅनेल स्वस्त आणि टिकाऊ असतील. याबरोबरच ते अधिकाधिक लोकांच्या छतापर्यंत पोहोचले पाहिजेत आणि सोलर पार्कही वाढवायला हवेत. भारतीय मालाची नेहमीच चिनी कंपन्यांशी स्पर्धा असते. भारतीय देशांतर्गत उत्पादक तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या इतके मजबूत नाहीत, त्यामुळे इतर देशांच्या बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी करावे लागेल. सौरऊर्जा क्षेत्रात नवीन रोजगाराच्या अनेक शक्यता आहेत. एक गिगावॅट सौरऊर्जा निर्मितीतून सुमारे चार हजार लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होऊ शकतो, असे आकडेवारीवरून दिसून येते. याशिवाय त्याच्या संचालन आणि देखभालीमध्येही रोजगाराच्या संधी मिळू शकतात. 2035 पर्यंत एकूण जागतिक सौर क्षमतेच्या आठ टक्के भारताचा वाटा अपेक्षित असताना, 363 GW क्षमतेसह जागतिक आघाडीवीर म्हणून उदयास येण्याची अपेक्षा आहे. इंटरनॅशनल सोलर अलायन्स, जी भारत आणि फ्रान्सने पॅरिसमध्ये 30 नोव्हेंबर 2015 रोजी लॉन्च केली होती. याची सुरुवात भारताने केली होती. त्यावेळी पॅरिस हवामान परिषद सुरू होती. या संघटनेत एकशे बावीस देश आहेत, ज्यांचे स्थान कर्क आणि मकर राशीच्या दरम्यान आहे. सूर्य वर्षभर या दोन रेषांमध्ये थेट प्रकाशतो, ज्यामुळे सूर्यप्रकाश आणि उष्णता जास्तीत जास्त प्रमाणात मिळू शकते. तथापि, विषुववृत्तावर सूर्यप्रकाश आणि उष्णता यांचे प्रमाण सर्वाधिक असते. भारतातील राजस्थानच्या थार वाळवंटात देशातील सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. सौर ऊर्जा मिशनचे लक्ष्य पाहिल्यास 2022 पर्यंत 20,000 मेगावॅट क्षमतेच्या सौर ग्रीडची स्थापना करण्याव्यतिरिक्त 2,000 मेगावॅट नॉन-ग्रिडच्या सुरळीत ऑपरेशनसाठी एक धोरणात्मक योजना दिसून येते. 2022 पर्यंत या मिशनमध्ये दोन कोटी सौर दिवे देखील समाविष्ट करण्यात आले आहेत. ई-चार्जिंग स्टेशनची स्थापना सुरू झाली आहे. सौरऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांसाठी हे एक उत्तम पाऊल आहे. विशेष म्हणजे, भारतातील वाहन उद्योगानेही वेगाने सौरऊर्जेचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे आणि अशी वाहने तयार केली जात आहेत जी पेट्रोल, डिझेलऐवजी सौरऊर्जेवर चालवता येतील. कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीसाठी कौशल्य विकास हा एक आवश्यक पैलू आहे. कोणत्याही देशाचे कुशल मानव संसाधन हे विकासात्मक आणि सुधारणात्मक नियोजनासाठी प्राणवायूसारखे असते. भारतात त्याची तीव्र कमतरता आहेच शिवाय खर्चाबाबतही आव्हान निर्माण झाले आहे. सौरऊर्जेची सरासरी किंमत प्रति किलोवॅट एक लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, जी सर्वांनाच परवडणारी नाही. भारतात अडीच लाख पंचायती आणि साडेसहा लाख गावे आहेत, जिथे खांब आणि तारा कमी-अधिक प्रमाणात पोहोचल्या आहेत, पण त्यांमधून वीज क्वचितच धावते. ग्रामीण उद्योजकता आणि तेथील मध्यम, छोटे आणि लघु उद्योगांना विजेच्या कमतरतेचा सामना करावा लागतो, त्यामुळे अनेक कौशल्ये संधी न मिळाल्याने तशीच राहतात आणि साहजिकच त्यांचे शहरांकडे स्थलांतर ही त्यांची मजबुरी बनते. दुग्धोद्योगापासून ते हस्तकलेशी संबंधित असे अनेक व्यवसाय खेड्यात आहेत, ज्यामध्ये सौरऊर्जेचा मोलाचा हातभार लागू शकतो आणि गावे स्वयंपूर्ण होऊ शकतात. तसे पाहता भारताने सौरऊर्जेच्या क्षेत्रातही काही प्रमाणात चमत्कार केले आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत सौरऊर्जा निर्मितीमुळे 194 कोटी टन कोळशाची बचत झाली असून 4.2 अब्ज डॉलरचा अतिरिक्त खर्च टाळला गेला आहे. भारत, चीन, जपान, दक्षिण कोरिया आणि व्हिएतनामसह सौरऊर्जा क्षमता असलेल्या पहिल्या दहा अर्थव्यवस्थांपैकी पाच आशियातील आहेत. सध्या सौरऊर्जा ही केवळ भविष्यातील गरजच राहणार नाही तर ती अत्यावश्यक असणार आहे. परंतु ते सर्वांसाठी उपलब्ध असेल तेव्हाच ते पूर्णपणे सक्षम आणि सशक्त होईल.

# मराठी भाषेचे भगीरथ : आद्यकवी मुकुंदराज


आधुनिक केसरी



राहुल दि.देशपांडे
अंबाजोगाई

**मराठी भाषेचे भाषा भगीरथ आद्यकवी मुकुंदराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त १९ डिसेंबर सोमवार मार्गशीर्ष कृष्ण एकादशीला त्यांच्या समाधीस्थानावर मोठी यात्रा भरते, तसेच हरिनामाचा जागर केला जातो. त्यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आद्यकवीच्या संक्षिप्त कार्याचा हा प्रयत्न,**

जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात अशी विश्वात्मक कल्याणाची कामना पसायदानात करणाऱ्या संत ज्ञानेश्वराच्या कितीतरी आधी अंबाजोगाईत नाथपंथी आद्यकवी मुकुंदराज होवून गेले. त्यांनीच मराठी भाषेतील 'विवेकसिंधु' हा पहिला ग्रंथ लिहिला. इ.स. ११२८ ते १२००हा मुकुंदराजाचा कालखंड. मुकुंदराज हे नाथपंथीय होते. आदिनाथ, हरिनाथ, रघुनाथ आणि नंतर मुकुंदराज अशी परंपरा आहे. ब्रह्मविद्येचा सुकाळु करण्यासाठी विवेकसिंधु ची निर्मिती झाली. महाराष्ट्राची लोकभाषा मराठी आहे तेव्हा ज्ञान हे मराठीतून उपलब्ध झाले पाहिजे. या प्रेरणेने मुकुंदराजांनी आपले ग्रंथ महाराष्ट्राच्या लोकभाषेत मराठीतच लिहिले.



जयंती तिरावरी मी बोलिलो मराठी वैखरी म्हणोनि येथ धरावी चतुरी शास्त्रबुद्धी वेद शास्त्राचा मतिथा महाटिया जोडे फलितार्थ तरी चतुरी परमार्थ कान घे यावा भाषा होय मराठी परिउपनिषदाचीच रहाटी तेथीचा अर्थ जीवाचिये गाठी कान बांधावा
अशा प्रकारची ग्रंथ रचना त्यांनी जाणीवपूर्वक मराठीत केली. हा ग्रंथ मराठी भाषेतील केवलाद्वैताचे उपनिषद होय. मुकुंदराजांनी सामान्य मराठी माणसांना सगुण भक्तीचा राजयोग सांगितला, त्यांच्या विवेकसिंधु ग्रंथाला मराठीत मोठे स्थान मिळाले. एकुण आठ प्रकरणे असलेला हा ग्रंथ १६७१ ओव्यांचा आहे. अनेक ग्रंथाची निर्मिती मुकुंदराजांनी केल्याचे त्यांच्या चरित्र्य लेखनात आढळते. बाराव्या शतकाचा विचार केल्यास विवेकसिंधुकर्ते मुकुंदराजांचे नाव चटकन येते. मायावादी अव्दैत तत्त्वज्ञान मराठीत आणण्याचा प्रथम मान त्यांच्याकडेच आहे.
मराठी व संस्कृत या दोन्ही भाषेत विवेकसिंधु असल्याचा उल्लेख आहे. मुकुंदराजांनी मराठीत तर गोपाळ मुदगल यांनी नंतर संस्कृतमध्ये रचना केली. नाथपंथी मुकुंदराजाच्या ग्रंथात योगानुभवाचे व गुरुवादी भक्तीच्या गुढवादी परंपरेला शोभेल असे वर्णन आहे. सांसरिकांसाठी त्यांनी सगुण भक्तीचा राजयोग प्रतिपादिला. वेदांत व योग यांचा पुरस्कार करणाऱ्या मुकुंदराजांचा सन्यासावर कर्मठपणावर भर नाही.बंदिस्त आणि तर्कबद्ध रचनेवरून विवेकसिंधु कर्त्यावर पंडिती वळणाची छाप होती हे स्पष्ट कळते.
राजा जयंतपाळ व मुकुंदराज यांच्या बद्दल एक कथा सांगितली जाते ती अशी : राजा जयंतपाळ हा अत्यंत कठोर असला तरी प्रत्येक बाबतीत सत्य शोधण्याची त्याची एक पद्धत होती. त्याचे सत्यशोधन आपल्या शक्तीच्या व अधिकाराच्या बळावर तो कसा करत होता त्याची साक्ष ही कथा देते. ब्रह्म म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी, पाहण्यासाठी त्याने अनेक साधु वैराग्यांना निमंत्रित केले. जे साधु-वैरागी आले मात्र ते ब्रह्म दाखवू शकले नाहीत. त्यांचा छळ करून मारून टाकले. योगायोगाने त्याची गाठ मुकुंदराजाशी पडली. जयंतपाळाने मुकुंदराजांना प्रश्न केला ब्रह्म म्हणजे काय? ते जाणण्याची, पाहण्याची इच्छा आहे. आपण ब्रह्म दाखवावे मग मुकुंदराजांनी जयंतपाळ राजास ब्रह्म दाखविण्याचे ठरविले. दोन चांगले तरबेज घोडे घेतले एका घोड्यावर स्वतःमुकुंदराज बसले, दुसऱ्या घोड्यावर जयंतपाळास बसविले. पुढे मुकुंदराज मागे जयंतपाळ असे निघाले. अंबाजोगाईच्या उत्तरेस गावाबाहेर आले तेथे एक खोल दरी लागली त्या दरीवरून मुकुंदराजांच्या घोड्याने सहज उडी मारली व ते दरी ओलांडून गेले पण जयंतपाळाचा घोडा दरी पार न करता त्यांच्यासह दरीत पडला, तेव्हा मुकुंदराजांनी वरून विचारले राजा, ब्रह्म दिसले का ? दरीतून आवाज आला मला ब्रह्म दिसले. मी ब्रह्म जाणले. इथे ही कथा संपते.अजूनही अंबाजोगाईत मुकुंदराजांच्या समाधीस्थानाजवळ ही दरी आहे. ती घोडदरी नावाने ओळखली जाते. आद्यकवी मुकुंदराजांनी मराठी भाषेतील पहिला ग्रंथ विवेकसिंधु हा राजा जयंतपाळासाठीच लिहिला.
नृसिंहाचा बल्लाळ, तयाचा कुमर जयंतपाळ तेने करविला गदारोळ ग्रंथरचनेचा
अशी शब्द निर्मिती आहे. मुकुंदराज अश्वदरीच्या मुकुंद पर्वताच्या पुर्व बाजूच्या गुहेत राहत असत तेथेच त्यांनी योगसाधना केली. वारकरी सांप्रदायाचे प्रमुख ज्ञानपीठ होण्याचा दर्जा समाधीस्थानास लाभला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे मुकुंदराजांच्या समाधी दर्शनास येवून गेल्याचे जुने लोक सांगतात. मुकुंदराजांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्त धार्मिक कार्यक्रम होतात. यात्रा भरते.
वंदन नंदनसा मी करितो भावे मुकुंदराजाला
वश झाल्या सव्दिद्या सत्किर्ती सुमुक्ति सुंदरा ज्याला
अशी रचना कवी मोरोपंतांनी केली आहे.लोक कल्याणाची तीव्र तळमळ असणारे मराठी भाषा भगीरथ मुकुंदराजांच्या चरणी विनम्र दंडवत.

# एका मूठभर गावाच्या विकासासाठी लागतं तरी काय बरं ?


चित्र : बाबूराव पाटील, भोकर

**गावाच्या मुलभूत गरजा कोणत्या ?
या प्रश्नाचं हे साधं सोपं उत्तर.**

१. पावसा-पाण्यात, थंडी-उनात राहायला घर.
२.इज्जतीनं खायला पोटोभर भाकर.
३.प्यायला, सांड्यालंवड्याला निर्मळ पाणी.
४.घरा-दारात आणि रस्त्याला रातच्याला उजेड.
५. किमान आपापल्या घरापस्वर जायला,नीट चलायला रस्ते. ६.सांडपाण्याचा निचरा व्हायला रस्त्यायच्या कडंनं झाकलेल्या नाल्या.
७.एक चांगलं अधुनिक सोई सुविधायुक्त ग्रामपंचायत कार्यालय.
७.एक चांगली जिल्हा परिषदेची शाळा जी संस्कारक्षम शिक्षण देवू शकेल लेकरांना मुळापासून.
८. लग्ना समारंभाला, सप्त्याला, जयंत्या-पुण्यतिथ्यांना एखादं सार्जवनीक सभागृह नाही तर अगदी सगळ्यांनाच उठता बसता येईल असं सार्वजनीक मंदीर.९.तालुक्याला जायला यायला किमान तिन चार चकरा मारणा-या एस.टी. बसेस नाही तर गावचेच चार दोन टमटम अडलं नडलं भागवायला.
१०.गावातल्या गावात छोटे मोठे रोजगाराचे साधनं.
११. बसस्ट्यांडला एखाद दुसरं चहाचं हाटेल.
१२.सर्दी पडस्याला गोळी औषध देणारं किमान बीएएमएसवाल्या डॉक्टरचं एखादं घरगुती का असेना पण दवाखाना.
१३. सगळ्या लाभार्थ्यांना इमानदारीनं सेवा देणारं स्वस्त धान्य दुकान.
१४. कुठल्याही कार्याला धावून येणारी जबाबदार तरुणाई
आणि...
१५. नैतिक वजन असलेली आभ्यासू, विवेकी, निस्वार्थी व्यक्ती जी सरपंच असेल आणि त्याची ग्रामपंचायत.

**सरपंचाच्या हातात गावाच्या विकासाची गुरुकिल्ली**

गाव पंचांना मतदान करतं.पंच सरपंच,उपसरपंच निवडतात.हे सरपंच उपसरपंच ग्रामसेवकाच्या मदतीनं गावगाडा हाकतात.गावासाठीचा विकास निधी हे लोक एकत्र बसून मार्गी लावतात. गावाच्या विकासाच्या सगळ्या कागदपत्रांवर पंच, उपसरपंच, सरपंच आणि ग्रामसेवकांच्या सह्या असतात. कागदोपत्री ही मंडळी लाईटच्या खांबांवर बल्ब लावल्याचे बिलं तयार करतात आणि बसवले म्हणून सह्या करतात.नळं बसवले, केल्या सह्या.रस्ते केले नीट म्हणून करा सह्या. शाळेला वर्ग खोली बांधून दिली म्हणून घेतात सही मुख्याध्यापकाची नरडीवर पाय देऊन. सरकारी एकून एक यौजना कागदावरच राबवल्याचा दस्तैवज एक दोन दिवसात होतो तयार आणि ग्राम विकासाचं खातं रिकामं होतं एका झटक्यात. गाव कायम अंधारातंच खितपत रहातं.पिढ्यान् पिढ्या तीच घरं आणि तेच लोक सत्तेची चव चाखत राहतात. गावात कुणाला हे माहीतही नसतं आणि कुणी नादही करत नाही नादाला लागण्याचा.पिढ्यान् पिढ्या गावंच्या गावं वेठीस धरली जातात. गावाचं नाव मोठं करायचं की मातीत घालायचं हे त्या गावची ग्रामपंचायत ठरवत असते. कळते कळवळ्याचे चार शहानेसुरते माणसं सत्तेत आले तर गाव आकार घेऊ शकतं पण तसं होत नाही.

**गावाच्या विकासाचा बृहतआराखडा :**

गावाच्या विकासाचा बृहतआराखडा अर्थात पंचवार्षिक विकासाचं नियोजन कुण्या ग्रामपंचायतीनं तयार केल्याचं ऐकिवात आहे ? राळेगणसिद्थी आणि पेपटराव पवारांच्या गावांची नावं अख्या महाराष्ट्राला माहीत आहेत परंतू त्यांच्या सारखं आपलंही गाव करावं असं कधी कुणाला वाटलं ? किती ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्याही गावाचा विकास तसा करता येवू शकेल म्हणून तिकडं जावून बघून येण्यासाठीचा एखादा आभ्यासदौरा काढला असेल बरं ? ग्राम- प्रशासन कसं असावं यासाठी कुठल्या लोकप्रशासन विषयाच्या प्राध्यापकांनी आपले विद्यार्थी या गावी नेवून तिथलं प्रशासन दाखवलं असेल आपल्या विद्यार्थ्यांना ? ग्राम विकासाच्या यौंजनांची इतंभूत माहिति असलेले किती पंच सरपंच सापडतील ? आपलं गाव आपला देश आणि आपण आपल्या गाव नावाच्या देशाचे पंतप्रधान समजून आपणंच आपल्या गावाचा

## संयमाचा परीघ


प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226


चित्र : बाबूराव पाटील, भोकर

भाग : ७

विकास करावा वाटणारे किती लोक निघतील बरं ? सगळ्यांनी गावाचा विकास बघून घेईल सरपंच म्हणून त्याच्यावरंच सोडून दिल्यानं न गावाला कसलं वळण दिसून येतं ना गावाची कसली गुणवान ओळख ?

**पोलीस पाटील कशासाठी असतो गावात ?**

छोट्या मोठ्या कुरबुरी कुठं होत नाहीत ? कोण भांडंत नाही कुणाशी ? गाव पातळीवरल्या छोट्या मोठ्या किरकि-या गावातच चार शहान्या माणसांनी सोडवाव्यात हा त्यामागचा हेतू. परंतू असं घडताना दिसत नाही.चर्चा करुन प्रश्न सोडवण्यावर विश्वासच बसू दिला जात नाही.पुर्वी ग्रामपंचायत कार्यालयाला चावडी असायची.छोटे मोठे भांडणं गावातलेच चार दोन शहाने माणसं सोडवित ज्यात सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील आणि पंच असंत. दोन्ही बाजू ऐकून घेतल्या जात आणि न्याय निवाडा केला जायचा.लोक या शहान्यासुरत्या माणसांना मानंत.ते ही न्यायाची बाजू घेत. कधी जाब विचारुन कधी धाक दाखवून कधी पोलिसांना कळवण्याची तंबी देवून कलह मिटलवे जा."पंचायत घालीन बघ" हा परवलीचा शब्द होता कधी काळी.गावचे कर्तेधर्ते माणसं आब राखून होते परंतू यात काळासोबतंच मोठे बदल घडंत गेले आणि गावातल्या माणसांचा एकमेकांवरचा विश्वासच उडून गेला.लोक सरळ सरळ पोलीस स्टेशन नाही तर कोर्टाची भाषा करतात. या पाय-यांची केवढी भिती आणि दहशत होती.गावांचं शहरांशी येणं-जाणं वाढलं तसा माणसांचा माणसांशी दुरावाही वाढंत गेला. आता कसल्याही छोट्या मोठ्या कारणांवरुन लोक सरळ सरळ "तुला तर कोर्टात बघतो !", " आता जावून एफ आय आर फाडतो" म्हणतात आणि वादंग माजतं.गाव पंचायती पासून दूर गेलं. गाव पंचांपासून दूर गेलं. कोणी विचारंत नाही आता पोलीसपाटलांना.गाव पातळीवरील शांतता आणि सुव्यवस्थेती जिम्मेदारी पोलीस प्रशासनाचे दूत म्हणून पोलीस पाटलांचं काम असतं परंती तो आदरभाव किती पोलीसपाटीलांना मिळतो. सरपंच आणि पोलीस पाटील एकमताचे सापडणे अवघड. गावाच्या स्वास्थ्यासाठी ही मंडळी गुण्यागोविंदानं सोबत असणं गरजेची गोष्ट असते. तालुक्याच्या नेत्यांपासून फटकून राहून चालत नाही म्हणंत सरपंच आणि त्यांच्या विरोधातील गट कायम आमदार खासदारांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत रहातात.गावात राबवावयाच्या यौजनांचा आभ्यास असलेल्या लोकांचा आभाव आहे. एका निवडनुकीला केलेला खर्च मग व्याजासगट काढायचा हे साधं सोपं गणित मांडून सगळे व्यवहार चालतात. मतदारांना मदिरा आणि मांसाहाराचा नैवद्य दाखवून सत्तेत आलेल्या लोकांकडून तुम्ही कशा अपेक्षा ठेवू शकता बरं विकासाच्या.या निवडनुका कुण्याही सभ्य माणसांच्या आवाक्यात राहिल्या नसल्याचं उघड बोलताहेत लोक.मग जाणकार आणि निस्वार्थी चांगले लोक कसे आणि कुठून येणार सत्तेत आणि कसा होणार गावांचा कायापालट. दाब-धमक्या, किरकि-या, कुटाने यामुळं चांगली माणसं या क्षेत्रापासून दूर गेली आहेत.'फलाना उभा आहे निवडनुकीला आणि त्याला निवडून द्यायला पाहिजे !' ही पवित्र भावना बळावत जाणं गरजेचं आहे.त्याशिवाय गावांचा विकास होणे नाही.

मुळात शिक्षण मोडून पडंत चाललंय आणि त्यामुळं या सगळ्या यंत्रणा कुचकामी होत चालल्या आहेत. सगळ्या नौक-यांना कॉलिफिकेशन अर्थात पात्रता विचारली जाते. गावाच्या विकासाचं राजकारण करायचं तर मग काय पाहिजे ? केवळ वयाचे २१ वर्षे पुरेशे आहेत ? शिक्षणाची किमान पदवीचीही अट नको पंच आणि सरपंच पदाला ? नेतृत्वाच्या कोणत्या निकषावर अर्थात कसोटीवर निवडले जावेत बरं हे लोक ? सरळ अंगठे बहाद्दरांना बसवावं सरपंचाचा खुर्चीत ? गावाचं क्षेत्र माहीत नाही, पीक पेरा माहीत नाही, गावाच्या मूळ समस्या माहित नाही, गावची लोकसंख्यामाहीत नाही. शाळेच्या पटावर गावातले किती लेकरं शिकत आहेत याची नोंद नाही. किती थकलेत आणि कितीजन निराधार आहेत, किती जमांना आजारांनी गाठलं आहे आणि किती लेकीबाळी उजवायच्या राहिल्या आहेत गावच्या ? कितीजन लगतच्या शहरांनी राहून गावगाडा हाकंत आहेत ? किती लग्न या सिजनमध्ये होणार आहेत आपल्या गावच्या लेकरांचे ? किती लोक उपासपोटी झोपंत आहेत आणि किती लोकांना वस्त्र नाहीत परीधान करायला ? कुण्या लेकराचं शिक्षण नाही ना सुटलं फिस भरता येत नाही आपल्या बापाला, मायीला म्हणून.किती बाळांतपणं अपेक्षीत आहेत नजीकच्या भविष्य काळात ? अशा किती तरी बाबींवर बारीक नजर असलेलं नेतृत्व आपल्या गावांनां लाभलं तर आपापल्या गावी लोक आनंदानं नांदतील.आपल्या मुठभर माणसांच्या शेपाचशे उंब-याच्या गावाला खरंच फार कांही करावं लागणार आहे. चार चांगले नितीमान माणसं पुरेशे आहेत गावाचा स्वर्ग घडवायला.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आहेत आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)**

# आलो म्हणे तुका । संतु न्याव्या विष्णू लोका ।।


पंकज वसंत पाटील
संपर्क क्र. 9850430579


आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील परंपरेत धर्मनीतीच्या विचारांस अग्रस्थान आहे. वेदांत, कर्मयोग, भक्तियोग समाजात रुजविण्याचे काम ह्या विचारांनी होते, आत्मोन्नती साधल्या जाऊन समजोन्नती होते. आपणात असलेल्या सर्व चांगल्या शक्ती लोकांच्या हिताकरिता खर्च करत राष्ट्राची अध्यात्मिक उन्नती करण्याचे काम संत महात्मे करत असतात. ह्या परंपरेचे आदर्श म्हणजे संत तुकाराम महाराज होय. देहभान विसरून किर्तनरंगात रंगलेल्या तुकाराम महाराजांच्या तोंडातून बाहेर पडलेल्या अंतर्बाह्य पवित्र असलेल्या अभंगावाणीतील अमृतसाठ्याचा गोडवा, पवित्रता यांच्या ज्या महान शिष्यामुळे आपल्याला अनुभवता येत आहे त्या संताजी महाराज जगनाडे यांची २१ डिसेंबर रोजी पुण्यतिथी.**

तुकोबारायांच्या सानिध्यामुळे भाग्यवान जाहलेल्या संताजी महाराजांबद्दल त्यांचे वंशज गोपाळबाबा म्हणतात...

संताजी तेली बहु प्रेमळ ।
अभंग लिहीत बसे जवळ ।
धन्य त्याचे सबळ ।
संग सर्वकाळ तुक्याचा ।।

८ डिसेंबर १६२४ रोजी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील सदुंबरे येथील आजोळी संताजींचा जन्म झाला. त्यांचे वडील विठोबा जगनाडे व आई माथाबाई हे विठ्ठलभक्त असल्याने संताजींवर लहानपणापासूनच धार्मिक संस्कार झाले. तेल घाण्यावर तेल काढून विक्री करण्याचा पारंपारिक व्यवसाय असलेले जगनाडे कुटुंब सात्विक असल्याने धार्मिक-अध्यात्मिक कार्यासोबतच गरजवंतांना होईल तेवढी मदत करण्याकडे त्यांचा कल होता. पारंपरिक व्यवसायात निपुण करण्यासाठी लेखन, वाचन, अंकगणित यांचे व्यावहारिक शिक्षण संताजींना घरच्या घरी मिळाले. त्या काळी असलेल्या बालविवाहाच्या प्रथेमुळे संताजी महाराजांचा विवाह वयाच्या १२ व्या वर्षीच यमुनाबाईशी विवाह झाला. तल्लख स्मरणशक्तीची देणगी लाभलेले संताजी महाराज घाण्यावर तेल गाळण्याबरोबरच ईश्वरभक्तीत लीन होत असत. घरातील धार्मिक वातावरणामुळे संताजींना भजन कीर्तनाची आवड जडली होती. त्या दरम्यान तुकाराम महाराजांनी कीर्तनांतून तत्कालीन अनिष्ठ रूढी, परंपरा व अंधश्रद्धेवर फार कोरडे ओढत समाजात विज्ञानवादी दृष्टिकोन रुजविण्याचा वसा घेतला होता. संत तुकाराम महाराजांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात पसरली होती. असेच एकदा तुकाराम महाराज संताजींच्या गावी कीर्तनाला आले असता त्यांची रसाळ वाणी व अमोघ ज्ञानाने भारावून जाऊन संताजींनी तुकोबांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना बोध देण्याची विनंती केली. तुकोबांनी त्यांना संसारात राहून भक्ती मार्गाची दिक्षा दिली. तेव्हापासून संताजी जगनाडे महाराज (संतू तेली ) संत तुकारामाच्या टाळकऱ्यांमध्ये सामील झाले. तुकोबा किर्तनास उभे मागे उभे राहणाऱ्या टाळकऱ्यांमधील निळोबाराय, रामेश्वरभट, गंगाधर मवाळ, संताजी जगनाडे, महादाजीपंत कुळकर्णी, शिवबा कासार, अंबाजीपंत, कोंडोपंत लोहकरे, मल्हारपंत कुळकर्णी, मालजी लाडे, गवरशेट वाणी, कान्होबा, नावाजी माळी, कोंडपाटील हे चौदा आसामी तुकारामांच्या विशेष प्रेमातले होते. तुकाराम महाराजांना हे सर्वजण गुरू मानत असत. तुकाराम महाराजांच्या जथ्यामध्ये असलेल्या टाळकऱ्यांमधील धृपद आळवणारी तसेच सर्वात लहान असलेली संताजी आणि गंगाजी ही जोडगोळी एकपाठी होतीच, त्यातही संताजीचे हस्ताक्षर सर्वोत्तम. त्यामुळे कीर्तन संपल्या संपल्या संताजी तुकारामांचे नवे अभंग आपल्या वहीमध्ये नोंदवून ठेवत. या वह्या प्राणपणाने जपत असत. तुकारामांच्या अंतकाळापर्यंत संताजींनी तुकोबांची संगत सोडली नाही. तुकाराम महाराज पंढरीची वारी नित्यनियमाने करीत त्यांच्याबरोबर असलेल्या अनेक शिष्यमंडळीत विशेष आवडीचे हे चवदा टाळकरी शिष्य असत. तुकारामांच्या तोंडून निघालेले अभंग प्रेमाने लिहून ठेवण्याचे काम संताजी जगनाडे तेली हेच करीत असे. तुकाराम महाराजांच्या अभंगांची अस्सल संहिता संताजींच्या लिखाणात दिसून येते. तुकारामांच्या माथी धर्मद्रोहाच्या पापाचा शिक्का मारून वाघोलीच्या दिवाणाने तुकारामांना सर्व लिखित वाङ्मय इंद्रायणीत बुडवण्याचा आदेश दिला.



तुकाराम आपले सगळे कवित्व इंद्रायणीला अर्पण करून आमरण उपोषणाला बसले. संताजी व गंगाजींनी तुकारामांचा बहुतेक ठेवा आपल्याजवळ तसा जतन करून ठेवला होताच, पण तुकारामांचे आणखीही काही साहित्य लोकामुखी होते. त्याचा शोध घेत दोघे सलग तेरा दिवस मावळ प्रांती रानोमाळ घराघरातून भटकले. जात्यावरील बायकांची गाणी, शेती करतानाची शेतकऱ्यांची गाणी, काही लोकांकडे असलेल्या नोंदी अशा सगळ्या गोष्टी त्यांनी जमा केल्या आणि आपल्याला माहीत नसलेला आणखी तुकारामही अक्षरबद्ध केला. संत तुकारामांची गाथा संताजीच्या अथक परिश्रमांमुळेच जिवंत राहू शकली, असा स्पष्ट निर्वाळा महिपतीबुवापासून तर महारा सारस्वतकार वि.ल.भावे यांच्यापर्यंत सर्वजण निखालसपणे देतात. तुकाराम महाराजांच्या सानिध्यात संताजी सुद्धा अभंग लिहू लागले. त्यांचे अभंग घाण्याचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत.

मजशी ते ब्रह्मज्ञान काही नाही ।
आपल्या कृपेने होईल सर्वथाही ।।
होईल मज आणि माझीया कुळांशी
पांडुरंग मुळाशी सर्व आहे ।।
संतू म्हणे ब्रम्ह ब्रह्मा सर्व जाणे ।
आपुले ते मन सुधारले ।।

तेलाच्या घाण्याच्या माध्यमातून संताजींनी जीवनाचा नेमका अर्थ उलगडून सांगितला आहे प्रपंच, संसार आणि समाज याचा उत्तम समन्वय साधत संताजींनी कर्मकांडाचा कडाडून विरोध करत लोकांना अध्यात्म व विज्ञान समजावले. त्यांनी लिहलेल्या 'शंकरदीपिका' आणि 'तैलसिंधु' काव्यग्रंथांचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आढळतो. संताजींच्या व्यवसायातील अनेक रूपकं, उपमा, अलंकार व चित्रण त्यांच्या अभंगांतून झळकते. मनरुपी वाऱ्याचा बैल जोडून आपल्या शरीराला त्रिगुण तिळाचे घुसळण करण्यासाठी भाव आणि भक्तीची लाट करून आपल्या विचार विवेकांवर शांतीची शिळा ठेवायला हवी असे संताजी सांगतात.

आमुचा तो घाणा त्रिगुण तिळाचा ।
नंदी जोडियला मन पवनाचा ।।
भक्ति हो भावाची लाट टाकियली ।
शांती शिळा ठेवीली विवेकावरी ।।
सुबुध्दीची वढ लावोनी विवेकांस ।
प्रपंच जोखड खांदी घेतीयले ।।
फेरे फिरो दिले जन्मवरी ।
तेल काढियले चैतन्य ते ।।
संतु म्हणे मी हे तेल काढियले ।
म्हणुनी नांव दिल संतु तेली ।।

संताजी महाराज जगनाडे १६९९ मध्ये मार्गशीर्ष वद्य त्रयोदशीला अल्प आजारानंतर वयाच्या ७६ व्या वर्षी पांडुरंगचरणी रुजू झाले. शेवटच्या क्षणी माती टाकण्यास येणार असे वचन संत तुकारामांनी संताजीना दिले होते, परंतु तुकाराम महाराज संताजींच्या अगोदरच वैकुंठाला गेले होते.

चारिता गोधन । माझे गुंतले वचन ।।
आम्हा येणे झाले । एका तेलीया कारणे ।।
तीन मुष्ठी मृतितका देख । तेव्हा लोपविले मुख ।।
आलो म्हणे तुका । संतु न्याव्या विष्णू लोका ।।

असे सांगतात की, संताजी वारले तेव्हा अंत्यसंस्काराच्या वेळी कितीही प्रयत्न केले तरी संताजींचे पूर्ण शरीर गाडले जात नव्हते, त्यांचा चेहरा वरच राहत होता. तेव्हा वैकुंठाहून संत तुकाराम महाराज आपले वचन पूर्ण करण्यासाठी आले व त्यांनी तीन मुठी माती टाकल्यानंतर संताजींचा पूर्ण देह झाकला गेला अशी आख्यायिका सांगितली जाते. संताजी जगनाडे हे तुकारामांच्या जीवलगांपैकी असल्याने त्यांच्या हातचे अभंग म्हणजे तुकोबांच्या मुखातून ते जसे स्रवले तसेच उतरविलेले आहेत. तुकोबांच्या तोंडची आणि संताजींच्या हातची भाषा शिवकालीन लौकिक मराठीचा अस्सल नमुना आहे. देहभान विसरून किर्तनरंगात रंगलेल्या तुकाराम महाराजांच्या तोंडातून बाहेर पडलेल्या अंतर्बाह्य पवित्र असलेल्या अभंगावाणीतील अमृतसाठ्याचा गोडवा, पवित्रता संतांजीमुळे आपल्याला अनुभवता येत आहे. शरीररूपी त्रिगुण तिळाच्या घाण्यास मनरुपी नंदी जोडून त्यावर भावभक्तीसह विचार-विवेकावर शांतिरूपी शिळा ठेवण्यास शिकविणाऱ्या संत शिरोमणी श्रीसंताजी जगनाडे महाराजांना कोटी कोटी प्रणाम !

# ग्राहक संरक्षणासाठी शासन कटिबद्ध



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**आपण भारताचा अमृत महोत्सव साजरा केला. आणि करतोय. गेल्या 75 वर्षांत भारताने अनेक क्षेत्रात प्रगती केलीआहे. मागे वळून पाहता 1947 पासून तो आज पावेतो ग्राहक संरक्षण याच्या बाबतीत कुठे आहोत त्यात कशी कशी प्रगती होत गेली व ग्राहक संस्था व शासन यांनी ग्राहकाची कुठलीही वस्तू खरेदी करताना, तसेच सेवा मिळताना काय काय उपलब्धी करून दिली आहे हे पाहणे तेवढेच महत्त्वाचे आहे.**

1947 नंतर सुरुवातीच्या काळात तसे पाहिले तर व्यक्तीच्या गरजा कमी होत्या. हळूहळू त्यात प्रगती होत गेली. विज्ञानाचे नविन मार्ग बरोबरच आपल्या आयुष्यात अनेक गोष्टींनी प्रवेश मिळवला जसे आपल्या रोजच्या रोजच्या जीवनात जीवनावश्यक वस्तूंचे सोबतच काही चैनीच्या वस्तू ही आल्यात. पण बदलत्या काळात त्या चैनीच्या न राहाता गरज बनल्या. जसे वाहन, टी. व्ही, ए.सी,वॉँशिंग मशिन. फ्रिज,कुलर, आदी .बाजारपेठेत स्पर्धा आली.त्याच बरोबर आपलाच माल,वस्तूंचा खप व्हावा म्हणून प्रलोभन आली.आणि तिथेच ग्राहकाची फसवणूक होऊ लागली.खरेदी सोबत कुठे घड्याळ,तर कँमेरा,अशा वस्तू मिळू लागल्याने ग्राहक आकृष्ट होऊ लागला...लकी ड्राँ, हेच कारण फसवणुकीला कारण होऊ लागले.

इ.स. १९७४पर्यंत ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणारी अशी कोणतीही संस्था भारतात नव्हती. ग्राहकचळवळीचे कार्यकर्ते बिंदू माधव जोशी यांनी अशी संस्था असावी अशी कल्पना लोकांना सांगितली, तर त्यांना लोकांनी वेड्यात काढले. पण तरीही पुण्यातले 'सोबत'साप्ताहिकाचे संपादक ग.वा. बेहरे, दैनिक सकाळचे संपादक मुणगेकर, पु.ल. देशपांडे, मुकुंदराव किर्लोस्कर, लेखिका कमल पाध्ये, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू देवदत्त दाभोळकर आदींनी ही कल्पना उचलून धरली आणि न्यायमूर्ती छगला यांच्या हस्ते अखिल भारतीय ग्राहक पंचायत या संस्थेच्या पुणे शाखेचे उद्घाटन झाले.
मुंबईतही या संस्थेची कल्पना कुणाला फारशी आवडली नाही. पण गायक आणि संगीतकार सुधीर फडके यांनी आग्रह धरल्याने त्यांच्या घरी पहिली बैठक झाली, आणि त्यानंतर पंचायतीचे काम सुरू झाले. काही वर्षातच भारतात सर्व शहरांत या संस्थेच्या शाखा सुरु झाल्या.
ग्राहक आंदोलन हे सुरुवातीला स्वयंसेवी संस्थांनी सुरू केले आणि मग त्याला हळूहळू सरकारचा पाठिंबा मिळू लागला. १९८६ सालच्या ग्राहक संरक्षण कायद्याचा मसुदा प्रथम ग्राहक पंचायतीने सादर केला आणि मग त्याला सरकारने कायद्याचे रूप दिले. १९९० साली ग्राहक्पंचायतीने २४ डिसेंबर हा भारतीय ग्राहक दिवस म्हणून घोषित केला आणि मग त्याला सरकारी मान्यता मिळाली.

देशभरातील ग्राहकांना संघटित करण्याच्या उद्देशाने १९७४ मध्ये पाच-दहा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ग्राहक पंचायतीची सर्वसामान्य ग्राहकाला त्याचे हक्क मिळवून देणारी ही चळवळ देशभर पसरली . जोशी यांच्या अथक प्रयत्नांमुळे १९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा संमत करण्यात आला.
महाराष्ट्र राज्यामध्ये भाजप-शिवसेना युती सरकार सत्तेवर असताना १९९५ मध्ये ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली होती. कॅबिनेट दर्जा असलेल्या या समितीचे अध्यक्षपद बिंदुमाधव जोशी यांनी भूषविले होते.
जागतिकीकरणानंतर जग हे ग्लोबल खेड्यात बदल होत आहे. ग्लोबल खेड्यांची बाजारपेठदेखील झपाट्याने विकसित होत आहे. विकसित होणाऱ्या बाजारात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनामुळे जगातील सर्वच देशातील नामांकित कंपन्यांचे ब्रँडस् सहजपणे उपलब्ध होत आहेत. त्यातच ऑनलाईन शॉपिंगचा पर्याय ग्राहकांकडे आल्याने नामांकित ब्रँडस् एका क्लिकसरशी ग्राहकांना घरपोच मिळू लागला आहेत. बाजारातल्या या वाढत्या स्पर्धेमुळे आज ग्राहक हा खऱ्या अर्थाने ग्राहक राजा बनला आहे. अशा परिस्थितीत ग्राहक राजाची फसवणूक होऊ नये याकरिता ग्राहक हक्क सरंक्षण व्यवस्था मजबूत असायला हवी. देशातील ग्राहक हक्क संरक्षण व्यवस्थेबाबत यानिमित्ताने जाणून घेता येईल. बाजारातील वाढत्या स्पर्धेचे ग्राहकांना मोठ्या




**भाग : १**

प्रमाणावर फायदे होत असले तरी काही ठिकाणी मात्र त्यांची फसवणूकदेखील होत आहे. अशा परिस्थितीत ग्राहकहिताचे रक्षण करण्याकरिता विविध पातळ्यांवर कार्य केले जात आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच हा याच व्यवस्थेचा एक भाग आहे. ग्राहक संरक्षण कायद्यातील तरतूदीनुसार स्थापन करण्यात आलेल्या या मंचाच्या माध्यमातून ग्राहकांच्या समस्या सोडविण्याचे कार्य होत आहे. स्पर्धेतून होणारी ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी ग्राहक तक्रार निवारण मंच हा महत्त्वाचा पर्याय ठरत आहे. भारतात ग्राहक हक्क संरक्षण चळवळ क्षेत्रात सुरूवातीला खाजगी व स्वंयसेवी संस्थांच्या पातळीवर प्रयत्न करण्यात येत होते.
ग्राहक हक्क संरक्षणासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या पुढाकारानेच देशात ग्राहक संरक्षण विधेयक मंजूर करण्यात आले. या विधेयकावर 24 डिसेंबर 1986 रोजी राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केल्यानंतर देशभरात तो कायदा म्हणून लागू करण्यात आला. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून भारतात 24 डिसेंबर रोजी 'राष्ट्रीय ग्राहक दिवस' साजरा करण्यात येतो.

ग्राहक संरक्षण कायद्यामुळे सर्व ग्राहकांना-
१) सुरक्षेचा अधिकारः- एखादी वस्तू आपण खरेदी करतो,तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची हमी उत्पदकानी घेणे आवश्यक असते.जसे फ्रीज,वॉँशिंग मशिन,टी.व्ही,मोटार जाईल,कार,अशा अनेक वस्तू.
२)उत्पादनाबाबतच्या माहितीचा अधिकार :-आपण खरेदी करत असलेल्या वस्तूंच्या गुणवत्तेविषयी माहिती विक्रेत्याने ग्राहकांना देणे बंधनकारक आहे. त्यात फसवणूक करु नये.
३) निवडीचा अधिकार :- उत्पादक एकाच प्रकारचे उत्पादन, वा ब्रँन्डचा आग्रह करु शकत नाही.वस्तूंचे निवडीचा अधिकार ग्राहकास आहे.
४)तक्रार करण्याचा व निवारणाचा अधिकार,हक्क :-खरेदीत फसवणूक झाली असे तर न्याय मिळवण्यासाठी आपले म्हणणे मांडण्याचा,हक्क अधिकार आहे.जिल्हा, राज्य तक्रार निवारण आयोगाने कडे जाण्याचा हक्क आहे.
५) ग्राहक शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे.:- ग्राहकांना हक्क,अधिकार, माहीत नसल्यामुळे बाजारपेठेत फसवणूक होते.ते समजवून घेण्यासाठीचा अधिकार, हक्क आहे.
६) या आधारे एखाद्या उत्पादन सेवेबाबत जाणून घेणे त्याबाबत तक्रार असल्यास त्याचे निरसन करुन घेण्याचा हक्क नागरिकांना मिळू शकला. या कायद्यामुळे ग्राहकांचे हक्क जोपासण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले.
सद्यस्थितीत शहरी भागापासून ते अगदी दुर्गम भागातील ग्राहकांच्या हक्काचे रक्षण होण्याच्या दृष्टीने काळजी घेण्यात येत आहे. यासाठी विविध पातळीवर ग्राहक मंचाची(आयोग) स्थापना करण्यात आली आहे. सध्या राज्यात जिल्हास्तरावर ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यरत आहेत. जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहक मंचाच्या माध्यमातून ग्राहक हक्काचे संरक्षण केले जात आहे. तिथे ग्राहकांचे समाधान झाले नाही तर राज्य किंवा राष्ट्रीय ग्राहक मंचच्या (आयोग)माध्यमातून ग्राहकाला न्याय मिळवून दिला जातो.
ग्राहक चळवळीला बळ देण्यासाठी महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम 2004 नुसार जिल्हास्तरावर ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. याअंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेतखाली समितीची स्थापना करण्यात आल्या आहेत. या समितीत विविध स्तरावरील सदस्यांची निवड करण्यात येते. तसेच राज्यस्तरावर देखील ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेचे ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री हे अध्यक्ष असतात तर राज्यमंत्री हे उपाध्यक्ष असतात.
ग्राहकांना आवश्यक मार्गदर्शन थेट मिळावं यासाठी राज्यात 15 सप्टेंबर 2011 पासून स्वतंत्र हेल्पलाईन कार्यरत आहे. ग्राहक 1800-22-2262 या क्रमांकावर हेल्पलाईनला फोन करुन आपल्या शंकाचे निरसन करु शकतात. ग्राहककेंद्रीत बाजारव्यवस्था निर्माण होणे ही काळाची गरज असताना अशा सुविधांचा लाभ घेऊन ग्राहकांनी देखील आपले हक्क जाणून घेणे गरजेचे आहे. हक्कांचा उपयोग करुन ग्राहक हित जोपासणारी व्यवस्था निर्माण होण्याच्यादृष्टीने सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्राहक हा 'राजा' होऊ शकेल.

वितरणा संबधित बाबीवरील तक्रारीसाठी निःशुल्क हेल्पलाईन क्रमांक १८००-२२-४९५० व १९६७ (बीएसएनएल आणि एमटीएनएल ग्राहकांसाठी) आणि वन नेशन-वन रेशन कार्ड संबंधी हेल्पलाईन नं. १४४४५सार्वजनिक वितरण प्रणालीतही बदल घडवून आणला.अन्नधान्य,ग्राहकसंरक्षण खाते निर्माण केले.बाजारपेठेतील मक्तेदारी, भावावर नियंत्रण ठेवण्याचे पाऊल उचलले. स्वस्तधान्य दुकानात बायोमेट्रीक पद्धतीने माल वितरण होऊ लागले. **(क्रमशः)**

# आयुष्याचा पैलतीर...



सुजाता नवनाथ पुरी
अहमदनगर

आधुनिक केसरी

**अनेक कवींच्या शब्दात सजलेली आणि अनेक भावनांचे घर असणारी वेळ म्हणजे संध्याकाळ. अनेक हिंदी चित्रपट आणि हिंदी गीतांमधून आपल्याला दिसणारी अशी ही मनमोहक शाम म्हणजेच संध्याकाळ. किती वेगवेगळी नावे ल्यालेली ही कातर वेळ. घरट्याकडे परतण्यासाठी आतुर झालेली पाखरे आणि दिवसभर कामात मग्न होऊन आत्ताशी निवांत झालेली माणसे.असंच काहीसं चित्र असतं.**

***सांज ये गोकुळी सावळी सावळी,***
***सावल्याची जणू सावली***
***पाहा पाखरे परतुनी होती घराकडे गोळा***
***कुठे बुडाला क्षितिजा पल्याड तो सोन्याचा गोळा***

मनाला हुरहूर लावणारी आणि जाणीवपूर्वक प्रयत्न करून विसरलेल्या गोष्टींची आठवण करून देणारी अशी ही गाय वेळ म्हणजे माय वेळ. रखरखणारे उन आता शीतल झालेले असते,ना धड दिवस ना धड रात्र अशी ही वेळ. निसर्ग आणि आपले जीवनचक्र यात खूपच साम्य आहे.जणू सकाळ म्हणजे आपले बालपण,दुपार म्हणजे आपले तारुण्य आणि सायंकाळ म्हणजेच वृध्दत्व . म्हणूनच सायंकाळ झाली कि जशी आपल्याला घराकडे परतीची ओढ लागते त्याच प्रमाणे आयुष्याच्या संध्याकाळी ही आता हे सगळं संपणार आहे याची हुर हूर लागते. आयुष्याची संध्याकाळ म्हणजे निवांत बसून गेलेल्या आयुष्याचे सिंहावलोकन करण्याची वेळ. काय कमावलं, काय गमावलं याचा विचार करण्याची वेळ.रिकाम्या ओंजळी पाहून शून्यात जाणारी नजर आणि डोळ्यापुढे येणारा एक एक क्षण. लहानपणी सगळ्यांचं प्रेम फुकट मिळत असतं असे म्हणतात. पण त्याच प्रेमासाठी वृध्दत्व मात्र आसुलेलं असतं.ते पैसे देऊन ही काहींच्या नशिबात मिळत नाही.

चेहऱ्यावर पडलेल्या प्रत्येक सुरकुतीमागे एक एक अनुभव दडलेला असतो आणि आपल्या जवळ असलेलं हे ज्ञान इतरांनाही द्यावं असं वाटत असतं. पण आपलं ऐकायला वेळ असतो कुणाकडे ?ज्याला त्याला ज्याचे त्याचे स्वतःचे अनुभव घ्यायचे असतात. आजवरचं जीवन फक्त धावत धावत जगलो.

कधी कर्तव्य भावनेतून तर कधी आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांसाठी.या सगळ्यात दुर्लक्ष झालं ते स्वतः कडे.दोन वेळच्या जेवणाची सोय व्हावी म्हणून चक्क जेवणाकडेच दुर्लक्ष केलं.पोटात भुक होती आणि खाल्लेले मानवेल अशी स्थिती ही होती. पण धावण्याच्या स्पर्धेत गुंतून गेलो आणि आता सगळं काही उपलब्ध आहे खाण्यासाठी, पण नेमकं तेच डॉक्टरांनी वर्ज्य करायला लावलेलं असतं.जणू काही दात आहेत तर चणे नाहीत आणि चणे आहेत तर दात नाही ही म्हण तंतोतंत लागू व्हावी.

आता मिळालेलं आयुष्य हे बोनस आहे हे कळतं पण वळत नाही. म्हणूनच कि काय मृत्यूचे भय वाटत राहते.आता कधी त्याचा बोलावा येईल हे सांगता येत नसतं.

कर्त्याची भूमिका केव्हाच संपलेली असते.आता आपल्याशिवाय ही हे घर चालू शकतं ही गोष्ट मनाला सांगून ठेवावी लागते.

***प्रवेश सरला***
***अंक बदलला***
***अंधारातच मंच मिळाला***

आपली भूमिका संपलेली असते आणि रंगमंचाचा ताबा इतरांनी घेतलेला असतो.

म्हातारपण म्हणजे दुसरं बालपण असतं. पण ते ही आईविना असलेलं. आई आपल्या बाळाने किती ही त्रास दिला तरी वैतागत नसते. इथं मात्र सगळ्यांनाच आपला वैताग होतो.जीवनाची ही संध्याकाळ खरंच रमणीय असते का ? कि हातातून सगळं गेल्यामुळे हताश झालेली असते.पैलतीर कधीचा खुणावत असतो. पण आठवणी मात्र जखडून ठेवतात. आनंद,दुःख आणि अशा किती तरी भावनांचा कल्लोळ मनात असतो.असं म्हणतात कि पूर्ण विराम म्हणजे वाक्याचा शेवट नसतो तर एका नव्या वाक्याची सुरूवात असते. पण मृत्यू नंतरचं कुणी पाहिलं आहे काय ? म्हणूनच अस्वस्थ होतं त्या कल्पनेने.

अनुभवांनी परिपूर्ण झालेलं मन आता कोणत्याही गोष्टी साठी हट्ट करत नाही. स्थित प्रज्ञता यावी तसे होते आणि माणूस गराड्यात ही एकटा व्हायला लागतो.ज्यांच्यासाठी आयुष्यभर मर मर कष्ट केले तेच विचारीत नसतील तर मग दुःखाला पारावर राहत नाही.कोरड्या पडलेल्या डोळ्यात अश्रू ही येत नाही.ह्रदयात मात्र काठोकाठ दुःख भरलेलं असतं.अस्ताला चाललेला सूर्य कधी अचानक नाहीसा होईल ते सांगता येत नसतं. तसंच आयुष्याचं ही होतं. विचारपूस करणारं कोणी मायेचा माणूस जवळ असेल तर मग या वाटेवर हिरवळ वाटते.

भरलेल्या घरात आपण ही तितकेच महत्वाचे आहोत हे पटलं कि मग जीवन कृतार्थ झाल्यासारखं वाटतं आणि पैलतीर गाठणे ही सोप होतं. आयुष्याची संध्याकाळ ही अशा अनेक आठवणींनी ओतप्रोत असते. ही संध्याकाळ कधी पूर्णत्वास जाईल याची कधीच खात्री नसते. म्हणूनच जीवनाचा विचार करताना शेवटच्या क्षणी हा संदेश देता येईल कि उर्दू शायर बशीर बद्र यांच्या शब्दात सांगायचे झाले तर


***-उजाले अपनी यादो के हमारे साथ रहेने दो***
***न जाने किस गली मे जिंदगी की शाम हो जाये.***

# डोकेदुखी!

आधुनिक केसरी

**डोके दुखण्याची अनेक कारणे असू शकतात. बहुतेक वेळा मर्यादित काळापुरतीची डोकेदुखी गंभीर नसते. अशा गंभीर नसणाऱ्या प्रकारापैकी स्नायूत तणाव निर्माण झाल्याने जाणवणारी डोकेदुखी हा प्रकार प्रत्येक माणसाने केव्हा ना केव्हातरी अनुभवलेला असतो. याला 'टेंशन हेडएक' म्हणतात. कपाळ, कानावरचा कवटीचा भाग, मानेच्या वर या भागात एखादा पट्टा आवळला जावा अशा प्रकारचे दुखणे असते.**

सामान्य डोकेदुखी ची कारणे.-
पोटसाफ नाही ,अपचन,पित्ताचा त्रास.
पोटात भुक असणे.
झोप पूर्ण न झाल्यामुळे ही डोकेदुखी होऊ शकते.
ग्लुकोजचे प्रमाण कमी होणे
दातांच्या दुखण्याने देखील डोकेदुखी होऊ शकते. दातांचे किडणे, अक्कलदाढ या समस्या ही असू शकतात.
तणाव, थकवा येणे ही सुध्दा तणावाची कारणे असू शकतात.
चष्म्याचा नंबर बदलल्यामुळे डोकेदुखी होते.
ज्यांना डोळ्यांचा चष्मा लागलेला नसेल व डोकेदुखीचा त्रास होत असेल त्यांनी अवश्य नेत्ररोगतज्ज्ञाकडे जाऊन डोळ्यांची तपासणी करून घ्यावी.
कधी कधी काही औषधे देखिल डोकेदुखीला कारण ठरू शकतात. उदा. ह्रदयरोगावरील व उच्च रक्तदाबासाठी घेतली जाणारी औषधे.
मायग्रेन नावाची डोकेदुखी अनुवंशिक असते. यात डोक्याचा अर्धाच भाग दुखतो. याचे कारण कोणत्याही खाण्याच्या पदार्थाची एलर्जी हे असू शकते.
सर्दीचा कायमस्वरूपी त्रास असणे, ऋतूत झालेला बदल, अधिक धुम्रपान इ. कारणांनीही डोकेदुखीची तक्रार असू शकते.
पूर्ण दिवस एका बंद रूममध्ये राहिल्याने शरीराला शुध्द हवा मिळू शकत नाही. यामुळेदेखिल डोकेदुखी होऊ शकते.
आज संगणक युगात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण तासंतास संगणकासमोर बसून असतात. यामुळेही डोकेदुखी होते. जास्त वेळ टिव्ही पाहणे डोकेदुखीस कारण ठरू शकते.
गंभीर आजारातील डोकेदुखी-
रक्तवाहिन्यांचे दोष – गुठळया, रक्तस्राव, इ.
मेंदूचे जंतुदोष – उदा मेंदूज्वर, मेंदूआवरण दाह, मेंदू-हिवताप, कर्करोग – मेंदूतल्या गाठी
इजा – मार
डोळा-कान, दात, मान, इ. अवयवांशी संबंधित डोकेदुखी
इतर संस्थांचे आजार उदा. फ्लू, डेंगू, अतिरक्तदाब, काचबिंदू, सायनसदुखी.
मेंदूच्या चेतांशी निगडित डोकेदुखी, मानदुखी
मात्र या आजारामुळे डोकेदुखी असल्यास डॉक्टर ना भेटा आजार अंगावर काढू नका.
इंस्टंट रिलिफ साठी उपाययोजना.-



सुंठ व दालचिनी ,जायफळ पेस्ट करा ती भुवया सोडून लावा.
पित्ताने डोके दुखत असल्यास गार दूध प्यावे.
आलेयुक्त चहा घ्या.
लवंगा भाजून वास घेत जा.
लिंबू पाणी घ्या
बर्फाचा शेक घ्या.
पुदिन्याचे रसात आँलीव्ह आँईल एकत्रीत करुन लावा .
चमचाभर आलेरस प्या,आल्याची पेस्ट लावा.
पाण्यात तुळशीची 10-15 पानं घालून ते उकळून घ्या. जास्त उकळल्यानंतर उरलेल्या निम्मं पाण्यात एक चमचा मध मिसळा आणि प्या.
ओवा खा तो गरम करा पुरचुंडी मध्ये बाधून व शेका.
चमचा भर तेल,चिमूटभर लवंग पावडर,सैधव यांची पेस्ट लावा.
लसणाची एका कळीचा रस बनवून प्यायल्याने देखील डोकेदुखीवर आराम मिळतो.
सफरचंदावर मीठ लावून खा.
जेष्ठमध, बडीशेपः दहा- दहा ग्रॅम पिंपळ, सुंठ जेष्ठमध आणि बडीशेप बारीक करा. यामध्ये एक चमचा पाणी मिसळून डोक्यावर लावल्याने आराम मिळतो.
काकडी कापून वास घेतल्याने आणि त्याच्या रसाने मालिश केल्यास तात्काळ आराम पडतो.
दूधी भोपळ्याची पेस्ट करून लावा.

# महसूल विभागाच्या नाकर्तेपणामुळे अवैधरित्या रात्रंदिवस बिनधास्त मुरूम वाहतूक सुरू

## बिलोली शहरात रात्रीस खेळ चाले; माफीयांना कोणाचा आशीर्वाद

आधुनिक केसरी न्यूज

**ज्ञानेश्वर शिरगिरे**

**बिलोली :** शहरातील महसूल विभागाच्या नाकर्तेपणामुळे बिलोली तालुक्यात मागच्या काही दिवसापासून दिवस रात्र मुरूम व वाळू माफियांनी मोठ्या प्रमाणात जेसीपीच्या साह्याने रात्र दिवस खंदन चालू असल्यामुळे याचा त्रास आजूबाजू च्या नागरिकांना सहन करावा लागत आहे. बिलोली शहराच्या कुंडलवाडी रोड लागत असलेल्या राईस मिल च्या समोर जेसीपी च्या साह्याने खंदन चालू आहे. प्रशासनाच्या अनदेखी कारभारामुळे मुरूम चोरी करून अवैद्य वाहतूक होत आहे. याला जबाबदार कोण असा प्रश्न सामाजिक नागरिकांना पडलेला आहे. गोणखंदन रात्रभर जेसीबीच्या साह्याने खंदन चालू असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. महसूलचे अधिकारी व तहसीलदार मात्र या गोष्टीकडे कानाडोळा करत आहेत. बिलोली शहरांमध्ये दोन ठिकाणी गोणखं सावळी रोड कोंडलापूर रस्त्यालगत तर दुसरी बाजू म्हणजे राईस मिलच्या समोर चालू आहे. दिवस रात्र या संधीचा फायदा मुरूम माफीया घेत आहेत. बिलोली तालुक्यातील मागील काही दिवसापासून रात्रीच्या वेळी जेसीबीच्या साह्याने मुरूम गौण खनिजांची चोरी व तस्करी वाढली आहे. या माफीयांना कोणाचा आशीर्वाद आहे. कुणाची भीती नाही कुणावरही कारवाई होत नाही. भर वेगात  हायवा चालवत असतात व मुरमाचे बारीक बारीक कण लहान मुलांच्या डोळ्यात जातात त्यामुळे लहान मुलांच्या डोळ्याचा खूप त्रास सहन करावा लागत



आहे आई-वडिलांना. मुरूम माफी यांनी  हाएवा वेगात चालवल्यामुळे एक्सीडेंट होण्याचे खूप प्रमाण वाढलेले आहेत. याचा त्रास मोटरसायकलस्वार पायी चालत जाणारे व्यक्ती व शाळेला जाणारे विद्यार्थी तसेच कॉलेजला जाणारे विद्यार्थ्यांना विद्यार्थिनी याचा त्रास सहन करावा लागत आहे. मुरूम माफी यावर ना कुणाची भीती ना कुणावरही कारवाई होत नसल्याने महसूल व पोलीस विभागाच्या नाकावर ठेचून मुरूम माफिया यांची दहशत वाढलेली बिलोली शहरात दिसून येत आहे. रात्रंदिवस नियमबाह्य व नियमाचे पालन न करता गौण खोदणे चालू आहे. नांदेड जिल्हा महसूल विभाग या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे, असा प्रश्न आम जनतेने मांडलेला आहे.

# लोकस्वराज्य आंदोलन तालुका शाखा हिमायतनगरच्या वतीने आढावा बैठक



आधुनिक केसरी न्यूज

**हिमायतनगर :** लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने हिमायतनगर येथे दि. १७ डिसेंबर २०२२ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीला मा. ॲड दत्तराज गायकवाड प्रदेशाध्यक्ष, लोकस्वराज्य आंदोलन युवक आघाडी महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी सखोल मार्गदर्शन केले आहे. तालुक्यामधील समाजातील युवक, कार्यकर्ते, पदाधिकारी, समाज बांधवाशी विविध विषयावर संवाद साधताना अन्याय, अत्याचार, अबकड वर्गीकरणाचा लढा, विविध राजकीय पक्षात सक्रिय समाज बांधवाची असलेली दुटप्पी भूमिका, येणाऱ्या सार्वजनिक स्थानिक स्वराज्य संस्थेत मातंग समाजांनी कशा पद्धतीने मतदान करावे याविषयी, राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सत्तेवर येण्यासाठी मातंग समाजाचा केलेला वापराविषयी, आगामी काळातील रस्त्यावरील लढाईचे नियोजन कसे करावे लागेल? यासाठी तयारी, असे अनेक प्रश्नांनावर गंभीर चर्चा केली. यावेळी तालुक्यातील विविध गावांमधील व शहरातील अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, नवयुवक,समाज बांधव आवर्जून उपस्थित होते. शेवटी आभार प्रदर्शन धोंडोपंत बनसोडे तालुकाध्यक्ष लोकस्वराज्य आंदोलन हिमायतनगर यांनी करुन, सर्व समाज बांधवांनी सहकार्य केल्याने धन्यवाद मानण्यात आहे.

# वैजापुरात ग्रा.पं.साठी 85.59 टक्के मतदान

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** तालुक्यातील 24 ग्रामपंचायतींच्या 169 जागांसाठी 18 डिसेंबर रोजी मतदान सुरळीत पार पडले. या निवडणुकीत वैजापूरात एकूण 85.59 टक्के मतदान झाले असून कोणताही अनुचित प्रकार न घडता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्याचे बघावयास मिळाले. 25 ग्रामपंचायत पैकी एक ग्रामपंचायत बिनविरोध झाल्याने उर्वरित 24 ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी 79 व सदस्य पदांसाठी 382 उमेदवार निवडणूक रिंगणात लढत होते. या ग्रामपंचायतीं मध्ये 34 हजार 139 मतदार असून यात 18 हजार 48 पुरुष मतदार व 16 हजार 91 स्त्री मतदार पैकी 13 हजार चारसे साठ पुरुष मतदार व 15 हजार सातसे साठ स्त्री मतदार असे एकूण  29 हजार 220 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आता सर्वच 20 डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन घोषित होणाऱ्या निकाला कडे लक्ष ठेऊन आहे.

# लक्ष्मीबाई गोविंदराव केंद्रे यांचे दीर्घ आजाराने निधन

आधुनिक केसरी न्यूज

**कंधार :** लक्ष्मीबाई गोविंदराव केंद्रे वय 85 वर्ष



रा.शेकापूर यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन दि.18/12/2022 रोजी सकाळी ठिक 11:30 वाजता दुःखद निधन झाले आहे. ते महात्मा फुले उच्च माध्यमिक विद्यालय शेकापूरचे संस्थापक अध्यक्ष तथा जि.प.नांदेडचे माजी सदस्य  संभाजीराव पाटिल केंद्रे साहेब, प्रा. डि.एन.केंद्रे सर यांची भावजय तसेच म.फु.विद्यालयाचे सचिव, शेकापूरचे माजी सरपंच  शिवाजीराव संभाजी पाटिल केंद्रे,कंधार न.पा.चे माजी नगराध्यक्ष  चेतनभाऊ केंद्रे,प्राचार्य  मोतिभाऊ केंद्रे, डॉ.डि.एन.केंद्रे, वसंतभाऊ केंद्रे ,आर.एफ.ओ. माधवराव केंद्रे , प्रा.यु.पी.केंद्रे सर यांच्या काकू व वरिष्ठ लिपिक  बालाजीराव केंद्रे यांच्या आई होत.  त्यांच्या पच्छात दोन मुल व चार मुली नातु व नातवंडे आसा मोठा परीवार आहे. त्यांचा अंत्यविधी दि.19/12/2022 रोजी दुपारी ठिक 10:00 वाजता शेकापूर येथे त्यांच्या  शेतात आंत्यविधी होणार आहे. केंद्रे परिवारास या दुःखातुन सावरण्याची ईश्वर शक्ती देवो.



# विठ्ठलपूर ग्रामस्थांचा मतदानावर टाकलेला बहिष्कार आश्वासनानंतर मागे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** वनहक्क दावेदारांना आदिवासी, अनुसूचित जाती, वंचितांना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित ठेवण्यात येते. या विरोधात अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने तालुकाध्यक्ष उदय गवळी पाटील यांच्या नेतृत्वाखाली विठ्ठलपूर शिवारात रविवारी आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत,तोपर्यंत ग्रामपंचायत निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय किसान सभेने घेतला होता. ग्रामसेवक, तलाठी, वनक्षेत्र अधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी वनपाल प्रविण कोळी, एम. एम. शेख ग्रामसेवक योगेश धाटबळे  सभेचे तालुका उपाध्यक्ष आप्पासाहेब बोडखे, सचिव संजय जिते, सहसचिव संदीप पवार, शीला नागरे, भाऊसाहेब कुशर, गोरखनाथ गायकवाड, अशोक सोनवणे, संगीता गायकवाड, सांडू माळी यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# श्रीक्षेत्र सराला बेटावर मंदिराचा जीर्णोद्धार व कलशारोहण

## 14 वर्षांमध्ये पंधरा कोटीचे भव्य दिव्य असेल दगडी मंदिर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र सराला बेटावर दिनांक 16 डिसेंबर ते दिनांक 23 डिसेंबर या कालावधीत भव्य हरिहर महायज्ञ तसेच विविध देवतांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कलशरुण व हरिहर महायज्ञाचे आयोजन केले असून या महायज्ञमधील योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज या श्रीक्षेत्र सराला बेटाच्या मुख्य समाधी मंदिराच्या कलशरोहन कार्यक्रम जुणा आखाड्याचे महंत कृष्ण गिरी महाराज व महंत रामगिरीजी महाराज यांच्या हस्ते आज संपन्न झाला. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र बेटावर महंत रामगिरीजी महाराज यांनी बेटाच्या गादीवर आल्यापासून बेटाचा चेहरा मोहराच बदलून टाकला आहे गोदावरीच्या कुशीमध्ये असलेल्या बेटात जीर्ण मंदिराचा जीर्णोद्धार करत 14 वर्षांमध्ये पंधरा कोटीचे भव्य दिव्य असेल दगडी मंदिर उभारले असून त्यामध्ये बेटाचे योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज ब्रह्मलीन नारायण गिरीजी महाराज यांच्या समाधी सह विविध देवतांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन निमित्ताने बेटात 16 डिसेंबर ते 23 डिसेंबर या कालावधीत भव्य हरिहर महायज्ञ आयोजित केला असून या कार्यक्रमाचा पूर्वार्धामध्ये कलश रोहन संपन्न करण्यात आला.

बेटामध्ये भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून आज या सप्तांहामध्ये ब्राह्मण वृंदाच्या मंत्रघोषात टाळ मृदंगाच्या गजरात भव्य मुख्य मंदिरावर विविध साधू संताच्या उपस्थितीत कलश रोहन संपन्न झाला आज बेटांमध्ये उपस्थित भाविकांना स्वर्ग अनुभूती आल्याशिवाय राहत नाही, प्रति पंढरीचा अवतरले असून पांडुरंगसुद्धा आज पंढरपूर मध्ये नसून बेटातच असल्याची अनुभूती भाविकांना मिळत होती. आज झालेल्या कलशरुण कार्यक्रम प्रसंगी जुन्या आखाड्याचे महंत कृष्णगिरी महाराज महंत रामगिरीजी महाराज महंत हरी शरण गिरीजी महाराज, ह भ प संदीप महाराज, बाळासाहेब महाराज रंजाळे, बाळासाहेब कापसे, ज्ञानेश्वर टेके, भाऊलाल सोमासे, सचिन जगताप, माऊली महाराज गुंजाळ, अशोक शेठ बोराडे, सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, नंदू निकम, आधीसह श्रीक्षेत्र सरला बेटातील शिष्य वृद्धांसह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.



# राज्यातील पेंशनर्सचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावा; पेंशनर्स डे मेळाव्यात मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राज्यातील सेवा निवृत्त कर्मचाऱ्याना केंद्रीय सेवा निवृत्त कर्मचाऱ्या प्रमाणे दरमहा एक हजार रुपये वैद्यकीय अंशदान द्या, निवृत्ताचा वृद्धापकाळ लक्षात घेता त्यांना वैद्यकीय सेवा सवलतीत पूरवा, ३० जून रोजी सेवा निवृत्त झालेल्यांना राज्य शासनाने न्यायालय निर्णयाप्रमाणे एक वेतन वाढ त्वरित द्यावी, केंद्र प्रमुख यांना एक वेतन वाढ द्यावी, सातव्या वेतन आयोगातिल थकीत दोन हप्ते शासनाने सेवा निवृतांना त्वरित द्यावेत, राज्यातील पेंशनर्सला दर महिन्याला दिली जाणारी पेंशन पाच तारखेच्या आत व्हावी, सेवा निवृतांची जात वैद्यता प्रमाण पत्र अभावी पेंशन रोखू नये अशा विविध मागण्या सादर करीत शनिवार( ता. १७ ) रोजी औरंगाबाद येथील डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम संशोधन केंद्रात पेंशनर्स डे साजरा झाला प्रथम कै. नाकारा व कै, हरिश्चंद्रराव जोशी यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर शेळके होते. सहाय्यक लेखा व कोषागार अधिकारी सचिन अन्नपूर्वे, जिल्हा शाखा अध्यक्ष वसंत सबनीस, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, रखमाजी जाधव, नामदेव घुगे, वैजापूर शाखेचे अध्यक्ष धोंडीरामसिंह राजपूत, पैठणचे प्रा. वले, मोरे, गंगापूरचे सद्भावे यांची उपस्थिती होती. पेंशनर्स डे गेल्या चाळीस वर्षापासून दर वर्षी १७ डिसेंम्बर या दिवशी देशभर साजरा करतात, जिल्ह्यातील १८ सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना आदर्श सेवा व्रती पुरस्कार ही प्रदान करण्यात आले.

# विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना एबीसी आयडी तयार करणे बंधनकारक

## अन्यथा परीक्षेला बसता येणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** UGC NEW DELHI व महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि परीक्षा नियंत्रक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या आदेशानुसार या शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांनी विविध कोर्ससाठी प्रवेश घेतला असेल त्यांनी स्वतःचा आयडी तयार करून घ्यावा, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व अभ्यास केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक (5258-A) धुळे चे केंद्र संयोजक प्राध्यापक नंदलाल म्हसदे यांनी केले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ABC ID तयार न केल्यास त्याच्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. सदर ABC ID अर्थात ACADEMIC BANK OF CREDITS मोबाईलमध्ये तयार कसा करावा ? याबाबत महाविद्यालयाकडून सूचना देण्यात येत आहे.



सदर मोबाईल वरती आयडी तयार करून आपण प्रवेश घेतलेल्या ठिकाणी त्याची नोंदणी करावी जेणेकरून आपल्या शैक्षणिक रेकॉर्ड त्यामध्यमातुन उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना काही अडचण असल्यास त्यांनी महाविद्यालयात येऊन संपर्क साधावा, असे आवाहनही प्राध्यापक नंदलाल म्हसदे यांनी केले आहे..




# देव्हारी येथे शालेय व्यवस्थापन समितीवर विठ्ठल चव्हाण यांची अध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी जि.प.शाळेत माझी शाळा, माझी जबाबदारी 'अंतर्गत शाळा शालेय व्यवस्थापन समिती चे बैठक संपन्न झाली जि.प.प्रा.शाळा देव्हारी येथे बैठक आयोजित करण्यात आले होते.सुरवातीला या अध्यक्षस्थानी विठ्ठल चव्हाण, उपाध्यक्ष गोपाल चव्हाण, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, रेश्मा जोतीलाल जाधव, मैना रवींद्र राठोड, सुरेखा दरबार राठोड, अफसर दगडू तडवी, सुरेश हंसराज राठोड, रवींद्र सरदार राठोड, राम पवार, अनिल जाधव, संजय जाधव, उपस्थित होते. त्यांनी क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले.सोबतच शालेय शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विठ्ठल चव्हाण, गोपाल चव्हाण, मुख्याध्यापक एम. एम गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक दिपक चोपडे सर यांनी केले, ते म्हणाले की, शालेय व्यवस्थापन समिती ही शाळेचा आत्मा व महत्वाचा कणा आहे, यावरच शाळेचा विकास अवलंबून असतो. अध्यक्षीय भाषणात विठ्ठल चव्हाण यांनी ही सर्व सदस्यांनी पुर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले. शालेय व्यवस्थापन समिती रचना, कर्तव्ये व जबाबदाऱ्या गुणवत्तापुर्ण शिक्षण व ची जबाबदारी, निपुण भारत अभियान, बालकांचे हक्क व सुरक्षितता, शालेय आपत्ती व्यवस्थापन, शालेय आर्थिक व्यवस्थापन, शाळा विकास आराखडा, शाळेचे सामाजिक या विषयावर व विठ्ठल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच, उपसरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण, शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# एकलव्य भिल्ल समाज संघटनेचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**अमळनेर :** एकलव्य भिल्ल समाज संघटना महाराष्ट्र राज्य सर्व रमेश सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली दि. १९/१२/२०२२ रोजी अमळनेर येथे तहसिल कार्यालयसमोर आदिवासी जनशाही धरणे आंदोलन सुरू केले आहे. याबाबत वृत्त असे की भाजपा सरकारने आदिवासी विरोधी निर्णय घेता व आदिवासी समाजाचे अस्तित्व संपुष्टात आणण्यासाठी निर्णय घेतलेला असून महाराष्ट्रात आदिवासी समाजाच्या नोकरी जागा बळकावत लाखो जागेवर बोगस आदिवासी लोक लागलेले होते. याचा पाठपुरावा करून सदर प्रकरणात सुप्रीम कोर्टाने गैर आदिवासी लोकांना तात्काळ बरखास्त करण्यात यावा असा आदेश सुप्रीम कोर्टाने देऊन देखील महाराष्ट्रातील भाजपा सरकारने सुप्रीम कोर्टाच्या आदेशाला दिला. स्वतःच कोर्ट होऊन लोकशाहीला कळिमा फासत बोगस लाखो आदिवासी लोकांना पायाखाली तुडविण्याचा गलिच्छ निर्णय घेऊन भारतात यापुढे दंडशाहीचा दंड शाही चालेल. लोकशाहीत नाही असा नवीन पायंडा पाडलेला दिसून येत आहे. परंतु सदर घेतलेल्या लोकशाही विरोधी निर्णय तात्काळ परत घ्यावा सदर अन्याय निर्णयाच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील एकलव्य भिल्ल समाज संघटनेच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून सरकारला त्याची जागा दाखवून देणार आहेत. यासाठी तहसिल कार्यालयासमोर उपोषण अमळनेर येथे सुरू आहे. या आंदोलनाच्या वेळी श्री रमेश सोनवणे अमळनेर तालुका अध्यक्ष जिल्हा सेवा आदिवासी समाज नाना पवार अमळनेर कार्याध्यक्ष श्री विकास सोनवणे



उत्तर महाराष्ट्र संघटक मातोश्री सोनवणे, मोतीलाल सोनवणे उत्तर महाराष्ट्र फॉ. संपर्कप्रमुख, आकाश मोरे कार्यकर्ता, सागर भिल्ल युवाअमळनेर अध्यक्ष हिरामण शालिक पवार, रवींद्र सुखदेव मालचे, समाधान मोरे, समाधान अहिरे, दीपक विजय भिल, रमेश तुळशीराम चव्हाण आदिवासी पारधी महासंघ राज्य सचिव महाराष्ट्र राज्य मुंबई आदी उपोषणाला बसलेले आहेत.

# अवैध धंद्येवाल्यांचा शेंगोळा यात्रेवर कब्जा

## पोलिस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील शेंगोळा यात्रेत अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला असून यात्रेकरूंची दिवसाढवळ्या लूट होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.पोलीस प्रशासनाने या अवैध धंद्यांवर कारवाई करून यात्रेकरूंची होणारी आर्थिक लूट थांबवावी अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.कोरोना मुळे गेल्या दोन ते तीन वर्षांपासून बंद असलेली शेंगोळा यात्रा या वर्षी कुठलेही निर्बंध नसल्याने जोमाने भरलेली आहे.यात्रेत पाळणे, खेळणे, स्टेशनरी-कटलरी, हॉटेल्स तसेच विविध प्रकारचे दुकाने थाटली आहेत. यात्रेला येणाऱ्या यात्रेकरूंसाठी मुख्य आकर्षण म्हणजे येथील देवी तुळसाईचे मंदिर आहे. राष्ट्र संत गाडगेबाबा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी असून दरवर्षी मार्गशीर्ष महिन्याच्या दत्त जयंती पासून या यात्रोत्सवाला सुरुवात होत असते,ही यात्रा तब्बल पंधरा ते वीस अविरत सुरू असते.या यात्रेला संपूर्ण महाराष्ट्रातुन यात्रेकरू आवर्जून उपस्थित राहतात.पंधरा ते वीस दिवस पार पडणाऱ्या यात्रेच्या माध्यमातून दररोज लाखोंची उलाढाल होत असते. सदर पंधरा ते वीस दिवस पार पडणारी ही यात्रा पहूर आणि जामनेर हद्दीत भरते. यात्रेला कुठल्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी पोलीस प्रशासना कडून कडक बंदोबस्त ठेवण्यात येत असतो. या यात्रेत अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला असून यात्रेला येणाऱ्या प्रत्येक नागरिकांच्या दृष्टीस हे अवैध धंदे पडत असतात. यात्रेत गावठी सह विना परवाना देशी-विदेशी दारू विक्री, काली-पिली(गुडगुडी), यासह अन्य प्रकारच्या अवैध धंद्यांचा भडिमार पाहायला मिळत असतो. भररस्त्यावर हे काली-पिली (गुडगुडी) सारखे अवैध धंदे राजरोसपणे सुरू असून यात्रेत फिरायला येणाऱ्या कुटुंबाना याचा नाहक त्रास सोसावा लागत असतो. बऱ्याचवेळा या ठिकाणी किरकोळ कारणावरून भांडणे-हाणामारी होतात. अनेकजण आपल्या कुटुंबाला यात्रेत फिरायला सोडून देऊन स्वःता काली-पिली(गुडगुडी) या ठिकाणी खेळ खेळायला जातात.यात्रेत येणाऱ्या नागरिकांची याठिकाणी हातचलाखी करून दिवसाढवळ्या लूट होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महिलांना तर संध्याकाळी असुरक्षित वाटत आहे कारण संध्याकाळी अवैध धंद्येवाल्यांचा सुळसुळाट पहायला मिळत आहे. यात्रेतील या अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासनाने कठोर स्वरूपाची कारवाई करून यात्रेत येणाऱ्या नागरिकांची होणारी आर्थिक लूट थांबवावी व "अवैध धंदे मुक्त" यात्रा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात शेंगोळा यात्रेचा नामोल्लेख करण्यासाठी कठोर पाऊले उचलावी अशी अपेक्षा सुज्ञ नागरिकांतून व्यक्त करण्यात येत आहे.

# भिकन हाजी साहेब यांच्या हस्ते काँक्रिट रस्त्याचा शुभारंभ



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग क्र.१३ येथे आजपर्यंत रस्त्याची सोय नसल्यामुळे नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या भागातील रस्ते संदर्भात माजी जिल्हाध्यक्ष समसुल हुदा व तेथील स्थानिक नागरिकांनी आमदार फारुख शाह यांच्याकडे रस्ता व गटार व्हावी याबाबत निवेदन दिलेले होते. या निवेदनाची आमदार फारुख शाह साहेब यांनी तत्काळ दखल घेत मुलभुत सोई सुविधा विकास योजने अंतर्गत भंगार बाजार रईस पाईपवाले यांच्यापासून ते युसुफभाई यांचे गॅरेजपर्यंत रस्ता काँक्रिट करणे या कामासाठी १० लक्ष रुपये मंजुर करून आणले. आमदार फारुख शाह यांच्या प्रयत्नाने धुळे शहरातील ज्या भागात रस्ते नाही,गटारी नाही त्याभागातील रस्ते व गटारीसाठी शासनाकडून निधी आणण्याचे काम आमदार फारुख शाह करत असून येत्या दोन वर्षात संपुर्ण शहरातील रस्ते व गटारीचे मुलभुत काम करण्याचे ध्येय आमदार फारुख शाह यांनी घेतला आहे.त्याच अनुषंगाने आज रोजी महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.१३ भंगार बाजार रईस पाईपवाले यांच्यापासून ते युसुफभाई यांचे गॅरेजपर्यंत रस्ता काँक्रिट करणे या १० लक्ष खर्चाच्या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे बंधु भिकन हाजी साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हाजी कलाम उल्ला होते. प्रमुख पाहुणे म्हणून एम.आय.एम जिल्हाध्यक्ष नासीर पठाण, नगरसेवक मुक्तार बिल्डर, सुलेमान मलिक, समीर शाह, वसीम शाह, इम्तियाज शाह, व परीसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळेस परिसरातील नागरीकांनी आमदार फारुख शाह यांनी केलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

# नारायण सुर्वे पुरस्कार राजा माने यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स दिल्ली व स्वानंद महिला संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा या वर्षीचा नारायण सुर्वे साहित्य रत्न पुरस्कार ज्येष्ठ संपादक व लेखक राजा माने यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराची घोषणा ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय महिला उपाध्यक्षा सुरेखा कटारिया व डॉ. सुनिता बोरा, कल्पना कर्नावट, साधना सावणे या पदाधिकाऱ्यांनी केली. जानेवारी २०२३ मध्ये एका विशेष सोहळ्यात हा पुरस्कार माने यांना प्रदान करण्यात येणार आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव तसेच महाराष्ट्राच्या हिरक महोत्सवानिमित्त राजा माने लिहिलेल्या आणि दत्ता थोरे व संतोष पवार यांच्या प्रगती प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या "ज्यांनी आभाळ कवेत घेतलं.." पुस्तकाबद्दल हा पुरस्कार माने यांना दिला जाणार आहे.महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचललेल्या विविध क्षेत्रातील ७५ मान्यवरांच्या व्यक्तिमत्त्वातील वेगळ्या पैलूंवर राजा माने यांनी लेखन केले आहे. या पुस्तकासाठी ख्यातनाम चित्रकार नितीन खिलारे यांनी रेखाटलेली रेखाचित्रे ही विशेष आकर्षण आणि चर्चेची ठरली आहेत. पुस्तकासाठी राजर्षी श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनी प्रस्तावना तर माजी राज्यपाल पद्मश्री डॉ.डी.वाय. पाटील यांनी मलपृष्ठ मनोगत लिहिले आहे.




# कोल्हापूरचा पृथ्वीराज डांगे व नागपूरची संजना जोशी ठरले वेगवान जलतरणपटू

## मालवणात राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**मालवण :** महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेच्या मान्यतेने आणि सिंधुदुर्ग जिल्हा हौशी जलतरण संघटना व मालवण नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मालवणच्या चिवला बीचवर आयोजित राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ५ किमी व ३ किमी अंतराच्या विविध गटातील जलतरण स्पर्धा संपन्न झाल्या. या सर्वांमधून ५ किमी अंतराच्या प्रमुख स्पर्धेत मुलांमधून वेगवान जलतरणपटूचा मान कोल्हापूरच्या पृथ्वीराज डांगे याने मिळविला. तर मुलींमधून नागपूरच्या संजना जोशी हिने वेगवान जलतरणपटूचा मान मिळविला. तर तीन किमी अंतराच्या स्पर्धेतून वेदांत गडाख व आरोही पालकडे यांनी वेगवान जलतरणपटूचा मान मिळविला. दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत नागपूर, कोल्हापूर, ठाणे, बेळगाव, रायगड येथील स्पर्धकांचे वर्चस्व दिसून आले.

मालवण चिवला बीच येथे काल व आज असे दोन दिवस सागरी जलतरण स्पर्धा रंगली. पहिल्या दिवशी ५०० मीटर, १ कि.मी., २ कि.मी. अंतराच्या मुलगे- मुली, ज्येष्ठ पुरुष व महिला, दिव्यांग पुरुष व महिलांच्या स्पर्धा झाल्या. यातून पाखी हलगेकर (बेळगाव), प्रिन्स काठवले (ठाणे), वेदांत मिसळे (बेळगाव), रेवा परब (ठाणे), आयुषी आखाडे (ठाणे), अनिष पई (बेळगाव) यांनी विजेतेपद मिळवीत 'वेगवान जलतरणपटू' चा मान मिळविला होता. तर आज ३ किमी व ५ किमी अंतराच्या विविध गटातील स्पर्धा झाल्या. विविध गटात विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते चषक, प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तर वेगवान जलतरणपटूंना भव्य चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धा यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या तांत्रिक टीम, स्वयंसेवक, स्थानिक पर्यटन व बोट व्यावसायिक, ध्वनी व्यवस्था, जीव रक्षक यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सिंधुदुर्ग जिल्हा हौशी जलतरण संघटनेचे अध्यक्ष डॉ. दीपक परब, राज्य संघटना सचिव राजेंद्र पालकर, ॲड. नाखवा, राज्य उपाध्यक्ष राजेश मोरे, घनश्याम कुवर, माजी सचिव किशोर वैद्य, खजिनदार अरुण जगताप ,आनंद माने, निल लब्दे, डॉ. राहुल पंतवालावलकर, नगरपालिकेचे अभियंता सुधाकर पाटकर, भास्कर कुलकर्णी, सौ. बेडगे, राजा केरीपाळे आदी व इतर उपस्थित होते.

# चाटे स्कूलच्या विविध उपक्रमांमुळे शाळेचे नाव लोकप्रिय सरपंच मीनाताई पांडव



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील चाटे पब्लिक स्कुल येथे सरपंच मिनाताई संजय पांडव यांच्या हस्ते रोबोटिक्स व कोडींग,लॅबचे उद्‌घाटन संपन्न झाले. रोबोटिक्स व कोडींग, लॅबचे उद्‌घाटन झाल्यानंतर सरपंच मीनाताई संजव पांडव यावेळी बोलताना म्हणाल्या की चाटे स्कुलच्या विविध उपक्रमामुळे शाळेचे नाव लोकप्रिय झाले व झपाट्याने विद्यार्थी संख्या व गुणवत्ता वाढत गेली व आत्ता पुन्हा शाळेने विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स व कोडींग, लॅबची भर पडल्याने शाळेच्या शैक्षणिक वैभवात आणखी भर पडली आहे व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात आणखी प्रगती होणार आहे तसेच रोबोटिक व कोडींग एकमेकांशी जोडले असून हे संगणक विज्ञानाचे आकर्षक क्षेत्र आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग हे रोबोटिकचे महत्वाचे पैलू आहे. दरम्यान यावेळी शाळेचे मुख्याध्यापक योगेश तांबे, कॉम्पुटर शिक्षक पराग खंडेलवाल यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यानी कार्यक्रमाच्या यस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले.

